नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. २२ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# पीक कर्जासाठी 'सिबील'ची अट नाही

## शेतकऱ्यांना दिलासा : मुख्यमंत्री फडणवीसांचे बँकांना आदेश

मुंबई : (स. गांवकरी)

सरकार ३० जूनपूर्वी कर्जमाफी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. जूनमध्ये कर्जमाफी झाल्यानंतर शेतकरी पुढच्या वर्षासाठी पात्र राहतील, असेही शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळत नसल्याच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले. सरकारचे पैसे जमा झाले नाही तरी एकदा यादी जाहीर केल्यानंतर बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज द्यावे, असे बँकांना निर्देश देण्यात आले असून, बँकांनी याला सहमती दर्शवल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांकडे सिबीलची मागणी कोणत्याही बँकेनं करू नये यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली. या बैठकीला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. या आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत कर्जमाफीसह खरीप हंगामशी निगडीत विविध गोष्टींवर भाष्य केले. यावर्षी दोन आव्हानं समोर असल्याचे फडणवीस म्हणाले. एल निनोमुळे कमी पाऊस आणि जागतिक



परिस्थितीमुळे करावे लागणारे खतांचे नियोजन ही दोन आव्हानं यावेळी असणार आहेत, पण या दोन्हीचे योग्य नियोजन करण्याची ग्वाही फडणवीसांनी दिली.

"जास्तीजास्त शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकेल यासाठी नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा सरकारी आणि ग्रामीण बँका ६७ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. तर राष्ट्रीयकृत बँका २६ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. त्यांचं टार्गेट ८० टक्के आहे. त्यांनी ८० टक्क्यांच्या वर टार्गेट पूर्ण केलं पाहिजे", असे फडणवीस म्हणाले. सिबीलची मागणी कोणत्याही बँकेनं करू नये यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रत्येक शाखेला पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही हे स्पष्ट आदेश काढले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

"यंदाच्या खरीप हंगामात अल निनोचं संकट आहे, हवामान खात्यानं मांडणी केलीय त्यात सरासरी पाऊस ८८ टक्के असेल असा अंदाज वर्तवला आहे. पश्चिम विदर्भ आणि मराठवाडा, आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भागात पावसाची तीव्रता जास्त असेल. महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम खरीपाचा असतो. राज्यात खरीपाचे १५२ लाख हेक्टर क्षेत्र आहे. यावर्षी राज्यात उतरत्या क्रमांने पाऊस पडण्याची शक्यता आहे. जूनमध्ये अधिक त्यापेक्षा कमी जुलै, त्यापेक्षा कमी ऑगस्टमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे पावसात अंतर पडण्याची शक्यता असून, त्याचा पिकावर देखील ताण येईल. जलयुक्त शिवाराची कामं वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"प्रत्येक जिल्ह्यात आवश्यतेपेक्षा जास्त बियाणं उपलब्ध आहेत", असे फडणवीस म्हणाले. राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणाची आवश्यकता आहे पण आपल्याकडे २८ लाख मेट्रिक टन बियाणं उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितले. "राज्यात सोयाबीन, कापूस, तूर, मका, भात, बाजरी इ. पुरेपुर साठा आहे. सर्व बियाणं प्रमाणित असावी यासाठी साथी पोर्टल तयार करण्यात आलं आहे. साथी पोर्टलवर नोंदणीकृत असणारं बियाणंच खरेदी करावं", असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी केले. यामुळे फसवणुक होणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

# गायीचा बळी देणे हा ईदचा भाग नाही

## उच्च न्यायालयाकडून बंदी कायम

मुंबई : (स. गांवकरी)

आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर, बैल, वळू, गायी, वासरे आणि म्हशींच्या कत्तलीवर निर्बंध घालणाऱ्या पश्चिम बंगाल सरकारने नुकत्याच जारी केलेल्या अधिसूचनेत हस्तक्षेप करण्यास कोलकाता उच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. १३ मे रोजी जारी करण्यात आलेली सरकारी अधिसूचना न्यायालयाने २०१८ मध्ये दिलेल्या निर्देशांचीच अंमलबजावणी आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. 'बार अँड बेंच'च्या वृत्तानुसार, "बंगाल सरकारने प्राण्यांच्या कत्तलीबाबत १३ मे रोजी जारी केलेली अधिसूचना उच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांचे पालन करूनच जारी करण्यात आली आहे", असे मुख्य न्यायमूर्ती सुजॉय पॉल आणि न्यायमूर्ती



पार्थ सारथी सेन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. न्यायालयाने अधिसूचनेच्या संदर्भातील याचिका फेटाळून लावताना, "२०१८ मधील रिट याचिका क्रमांक ३२८ मध्ये समन्वय खंडपीठाने दिलेला आदेश अंतिम आहे. याबाबत वाद नाही. ही बाब लक्षात घेता, १३ मे २०२६ रोजीच्या जाहीर अधिसूचनेला स्थगिती देण्याचे किंवा ती रद्द करण्याचे कोणतेही ठोस कारण आम्हाला दिसत नाही," असे स्पष्ट केले.

### याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद

तृणमूल काँग्रेसचे आमदार अखरुझामन यांनी याचिकेतून असा युक्तिवाद केला होता की, "राज्य सरकारने १३ मे च्या अधिसूचनेत 'पश्चिम बंगाल प्राणी कत्तल नियंत्रण कायद्या'च्या कलम १२ अंतर्गत कोणतीही सूट दिलेली नाही. त्यामुळे आगामी बकरी ईद दरम्यान प्राण्यांच्या बळीची धार्मिक प्रथा कायदेशीररित्या पार पाडणे अशक्य होईल. बहुसंख्य मुस्लिमांसाठी म्हैस, बैल किंवा वळू यांसारख्या मोठ्या प्राण्यांचा बळी देणे हाच धार्मिक कर्तव्य पार पाडण्याचा एकमेव आर्थिकदृष्ट्या परवडणारा मार्ग आहे", असा युक्तिवाद अखरुझामन यांनी केला. दरम्यान, कोर्टाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला यावेळी दिला. "सर्वोच्च न्यायालयाने पूर्वीच स्पष्ट केले आहे की गायीचा बळी देणे हा ईद-उल-अजहाचा अनिवार्य भाग किंवा इस्लाममधील बंधनकारक धार्मिक प्रथा नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## थोडक्यात...

### परीक्षेवेळी 'रेबॅन मेटा' चष्म्याचा वापर

पुणे (स. गांवकरी) : एकीकडे वैद्यकीय प्रवेशासाठीच्या 'नीट' परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाचा तपास सुरू असताना सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेदरम्यान अत्याधुनिक तंत्रज्ञान वापराचे प्रकरण समोर आले आहे. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांनी कॅमेरा असलेल्या चष्म्याचा वापर केल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांनी त्या चष्म्याचा गैरप्रकार करण्यासाठी वापर केल्याचा पुरावा आढळून आलेला नाही. मात्र, संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेपासून प्रतिबंधित करण्यात आले असून, हे प्रकरण परीक्षा गैरप्रकार समितीकडे सोपवण्यात आले आहे. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या प्र कुलपती, प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर यांनी या प्रकाराबाबतची माहिती दिली.

### जिवंत जाळणाऱ्या पतीला जन्मठेप

अलिबाग (स. गांवकरी) : पत्नीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला जिवंत पेटवून खून केल्याप्रकरणी पतीला माणगाव जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दिपक अशोक झांजे (वय ३६) असे दोषी ठरलेल्या आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला चार हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे. दंड न भरल्यास चार महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागणार आहे. ही धक्कादायक घटना ३१ डिसेंबर २०२१ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास महाड तालुक्यातील ढालकाठी येथील आरोपीच्या राहत्या घरी घडली होती. कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर आरोपी दिपक झांजे याने पत्नी निशा झांजे (वय २८) यांच्या अंगावर प्लास्टिकच्या बाटलीतून पेट्रोल ओतले आणि माचिसच्या सहाय्याने त्यांना पेटवून दिले. गंभीर भाजलेल्या निशा झांजे यांना तातडीने उपचारासाठी मुंबई येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### मोबाईल टॉवर चोरीला

सांगली (स. गांवकरी) : सांगलीत चोरी होणे ही काही आता औत्सुक्याचा विषय उरलेला नाही. यावर फारशी चर्चाही आता होत नाही. कारण ही नित्याची बाब ठरली आहे. कधी सोन्याचे दागिने, कधी पैसे, तर कधी दुचाकी, चारचाकी यांची चोरी ही नित्याची बाबच आहे. मात्र, मिरज तालुक्यातील आरग येथे चक्क मोबाईल टॉवरचीच चोरी झाली असून लोखंडी सांगाड्यासह १९ लाख ६० हजाराचा ऐवज लंपास करण्यात आल्याची तक्रार मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्याची माहिती गुरूवारी मिळाली. आरग येथे आरग ते विशाल ढाब्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत देवदास माने यांच्या गट नंबर ८३५ या शेतात रस्त्याकडेला जिओ मोबाईलचा टॉवर उभारण्यात आला होता. हा टॉवर गेले कित्येक दिवस या ठिकाणी ध्वनीलहरी एकत्रित करून ग्राहकांच्या भ्रमणध्वनीपर्यंत पोहचविण्याचे काम करत होता. मात्र, गेल्या काही दिवसात मोबाईलवरील ध्वनीलहरींचे प्रमाण क्षीण झाल्याचे दिसत होते. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी टॉवर उभा केलेल्या ठिकाणी जाउन पाहणी केली असता मोबाईल टॉवरच गायब झाल्याचे आढळून आले. या टॉवरची चोरी झाल्याचे दिसून आले. अज्ञातांनी टॉवरसाठी असलेल्या साडेतीन लाखाच्या पाच बॅटऱ्या, सहा लाख २० हजाराचे पाचजी नेटवर्क अँटेना, केबल, ७० हजाराचा कळफलक, २ लाख ४० हजाराचा कक्ष, २ लाख ९० हजाराचे जनरेटर याच्यासह १ लाख ३० हजार रूपये खर्च करून उभारण्यात आलेला लोखंडी सांगाडाही गायब केला आहे.

# इंधन डेपोवर टँकरच्या रांगा, पुरेसा साठा असल्याचा प्रशासनाचा दावा

सांगली : (स. गांवकरी)

जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असतानाच इंधन उपलब्ध करून देणाऱ्या मिरजेतील इंधन डेपोवर टँकरच्या रांगा लागल्या आहेत. मिरजेतील इंधन डेपोसाठी मुंबईतून होत असलेल्या इंधन पुरवठ्यात दिरंगाई होत असल्याने पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याची माहिती मिळाली. तर कृत्रिम टंचाई, जादा दराने विक्री करण्याचे प्रयत्न ज्या पंपावर आढळतील अशा पंपाचा परवाना तात्काळ निलंबित करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी दिला आहे. सांगलीसह सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी या चार जिल्ह्यांना इंधन पुरवठा करण्यासाठी भारत पेट्रोलियम व इंडयिन ऑईल या कंपनीचे इंधन डेपो मिरजेत आहेत. पंपचालकांनी पैसे भरले की संबंधित पेट्रोल पंपापर्यंत टँकरने इंधन पुरवठा केला जातो.



मात्र, आखाती युध्दामुळे मुंबईतून रेल्वे वॅगनद्वारे होणारा इंधन पुरवठा अनियमित झाल्याने इंधनाचे टँकर भरण्यातही विलंब होत आहे. दोन-दोन दिवस टँकर भरण्यास विलंब होत असल्याने पंपावर इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. यामुळे काही पंपावर इंधन समाप्त झाल्याचे फलक लावावे लागत आहेत. यामुळे इंधन उपलब्ध असलेल्या पंपावर वाहनांच्या रांगा लागत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, इंधन पुरवठा सुस्थितीत राहावा यासाठी जिल्हाधिकारी डॉ. घोष यांनी प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांसह इंधन पंपावर जाउन झाडाझडती घेतली.

# वाई लघु कुंभमेळ्यास उत्साहात प्रारंभ

सातारा : (स. गांवकरी)

वाई येथे होणाऱ्या 'लघु कुंभमेळ्या'चा फीत कापून, तसेच महादेव, महागणपतीच्या प्रतिमांचे पूजन करून उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, गुजरातहून आलेले परमपूज्य महंत महादेवगिरी महाराज, योगेंद्रगिरी महाराज, नगराध्यक्ष अनिल सावंत, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा अरुणादेवी पिसाळ, विराज शिंदे, स्वप्निल गायकवाड, उपनगराध्यक्ष घनश्याम चक्के, विरोधी पक्षनेते विजय ढेकाणे, प्रदेश उपाध्यक्ष सचिन घाटगे, मंदिर महासंघ तालुकाध्यक्ष श्रीधर भाडळकर, राजेंद्र पुजारी, कृष्णा नदी सेवा समितीचे सदस्य काशिनाथ शेलार, सचिन सावंत, नीलेश मोरे, प्रवीण जाधव आदी उपस्थित होते. यावेळी जयकुमार गोरे म्हणाले, वाई नगरीला 'दक्षिण काशी' अशी ओळख असून, कृष्णा नदीच्या तीरावर वसलेले हे ऐतिहासिक शहर हिंदुत्वाच्या



विचारांची परंपरा जपणारे आहे. या पवित्र भूमीत आयोजित करण्यात आलेल्या लघु कुंभमेळ्यामुळे वाई नगरी अधिक पावन झाल्याची भावना मंत्री गोरे यांनी व्यक्त केली. वाईच्या कुंभमेळ्याची महती संपूर्ण राज्यात पसरणार असल्याचे गोरे यांनी सांगितले. २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी तयारी करत असल्याचे सांगितले. 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पावन वाई नगरीत आयोजित 'लघु कुंभमेळा २०२६' च्या शुभारंभाचा मान मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत समाधान आणि अभिमानाची बाब आहे, असे गोरे म्हणाले.

कृष्णामाईच्या पवित्र तीरावर आयोजित करण्यात आलेला हा 'लघु कुंभमेळा' केवळ धार्मिक सोहळा नसून हिंदुत्वाच्या संस्कारांचा, अध्यात्मिक परंपरेचा आणि सांस्कृतिक वैभवाचा भव्य उत्सव आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आयोजक, साधुसंत, नगराध्यक्ष अनिल सावंत, सर्व नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा दिव्य सोहळा यशस्वी होत आहे. वाईच्या या 'लघु कुंभमेळ्या'ची महती संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचेल असे ते म्हणाले. यावेळी गुजरात अटल धामचे महंत महादेवगिरीजी महाराज म्हणाले, अशा धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात एकात्मता वाढते व हिंदुत्ववादी विचारांना बळ मिळते, या कुंभमेळ्यामुळे वाई तालुका सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. नगराध्यक्ष अनिल सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी येणाऱ्या सर्व साधुसंतांचे स्वागत केले.

# विधान परिषदेसाठी महायुतीत रस्सीखेच

## भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीला हव्यात अधिक जागा

मुंबई : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांची निवडणूक महायुती म्हणून एकत्र लढविणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले असले तरी १७ जागांवर भाजप, शिवसेना व राष्ट्रवादीने केलेल्या दाव्यांमुळे महायुतीत तिढा निर्माण झाला आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या १७ पैकी १२ जागा लढविण्यावर भाजप आग्रही आहे. ठाणे, नाशिक, संभाजीनगरसह सात जागांसाठी शिवसेनेने (शिंदे गट) दावा केला आहे. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला तीन जागा हव्या आहेत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांनंतर महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायतींमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची संख्या पाहता भाजपची ताकद वाढलेली आहे. त्यामुळे भाजप १७ पैकी १२ जागा लढवण्यावर ठाम आहे. उर्वरित पाचपैकी तीन शिवसेनेला (शिंदे गट) आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) देण्याची भाजपची योजना आहे. परंतु, शिवसेनेने विधानसभा, महापालिका निवडणुकीप्रमाणे याहीवेळेस ठाणे, नाशिकसह संभाजीनगरकरिता आपली ताकद पणाला लावली आहे. छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भाजपचे संख्याबळ अधिक असले तरी शिवसेना या जागेसाठी आग्रही आहे. शिवसेना-भाजप युती असताना २०१९ साली झालेल्या निवडणुकीत ही जागा भाजपने तेव्हा एकसंध असलेल्या शिवसेनेला सोडली होती. तशी ती याही निवडणुकीत सोडावी, असा शिवसेनेचा आग्रह आहे. ठाण्यातही भाजपचे संख्याबळ अधिक आहे. परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ही जागा आपल्याकडे कायम राहावी, असा शिवसेनेचा दावा आहे. . शिवसेनेने नाशिक, कोकण, यवतमाळच्या जागांची मागणी केली आहे. गेल्या वेळी नाशिकमधून शिवसेनेचे आमदार निवडून आले होते याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. कोकणातील रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाकरिता तिन्ही पक्ष इच्छुक आहेत. गेल्या वेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे हे निवडून आले होते. यामुळे ही जागा राष्ट्रवादीकडेच कायम राहावी, अशी तटकरे यांची भूमिका आहे. कोकणात सर्वाधिक सदस्य निवडून आले असल्याचे या जागेवर शिंदे गटाचा दावा आहे. रायगडवर वर्चस्व असल्याने ही जागा राष्ट्रवादीकडे आहे. परंतु, या ठिकाणी शिवसेनेनेही हातपाय पसरले आहे.



### जागावाटपाचे सूत्र ठरलेले नाही - शिंदे

विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांसाठी भाजपच्या नेत्यांकडून १२ जागा भाजपला, तीन जागा शिंदे गट तर दोन जागा राष्ट्रवादीला असे जागावाटप करण्याची योजना मांडली जात आहे. त्याबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना विचारले असता, जागावाटपाचा असा कोणतेही सूत्र अद्याप ठरलेला नाही. तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून यावर चर्चा करतील आणि त्यानंतरच जागावाटपाचा निर्णय घेतला जाईल, असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिले.

# मुख्यमंत्र्यांकडून बँक अधिकाऱ्यांची कानउघडणी

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्राला होणाऱ्या कर्ज पुरवठा रक्कमेत सतत वाढ होत आहे. त्याच वेळी कर्ज खातेदारांची संख्या वाढत नाहीत, उलट कमी होत गेली.. ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे. बँकांनी याची अत्यंत गंभीरपणे दखल घेऊन, कर्ज खातेदार वाढविण्यासाठी सविस्तर योजना तयार करावी. कृषी कर्ज देताना बँकांनी सिबिल मागू नये. सिबिलसाठी कर्ज नाकारू नका, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँकर्स समितीची (एसएलबीसी) १७१ वी बैठक पार पडली.राज्यात २०२२-२३ मध्ये ६१.१५ लाख कर्ज खाती होती. ही संख्या २०२३-२४ मध्ये ५६ लाखांवर आली. २०२४-२५ मध्ये ५४ लाखांवर पोहोचली आणि २०२५-२६ मध्ये ती केवळ ४३ लाखांवर आली आहे. कर्ज खातेदारांची संख्या ६१ लाखांवरून ४३ लाखांपर्यंत घसरली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. नेमके काय चुकत आहे, याचा गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. चार वर्षांत १७ लाख खातेधारक कमी झाल्यावरून मुख्यमंत्र्यांनी बँक अधिकाऱ्यांची कानउघडणी केली.



कृषी कर्ज वितरणात समोर आल्या या गंभीर त्रुटी

कर्ज मिळण्यासाठी बँकांकडून अडवणूक होत असल्याने शेतकरी बँकांकडे येत नाहीत.. बँकांनी कर्ज नाकारल्यास शेतकरी सावकरांकडून कर्ज घेणे पसंत करतात. तेथे शेतकऱ्यांची फसवणूक व अडवणूक केली जाते. त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या होत्या. यंदाच्या वार्षिक कर्ज आराखड्यात कृषी आणि संलग्न क्षेत्राला एकूण ५२ लाख ६४ हजार ३२३ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्याचे उद्दिष्टे दिले आहे. त्यात ७९,४०२ कोटींचे पीककर्ज, १ लाख ४८ हजार ०५७ कोटींचे कृषी मुदत कर्ज, कृषी आधारित सुक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी ७ कोटी ९ हजार २८६ कोटी रुपये, अन्य प्राधान्य क्षेत्रांसाठी १ कोटी ४३ लाख ३५५ कोटी आणि बिगर प्राधान्य क्षेत्रासाठीच्या ४१ लाख ८४ हजार २२३ कोटी रुपये कर्जाचा समावेश आहे.




ठाणे : दिव्यातील साबेगावची आई गावदेवी चिचूआईचा ३ रा वर्धापनदिन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. देवीची महापूजा, अभिषेक व महाआरती व सायं ४.३० ते ९ वा. - आईचा पालखी सोहळा रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी साबे ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सर्वांना आमंत्रीत करण्यात आले होते. (फोटो - संतोष पडवळ )

# शेतकऱ्यांची मुस्कटदाबी खपवून घेणार नाही : संतोष वाडेकर

## भूमिपुत्र शेतकरी संघटना गुन्हे मागे घेण्यासाठी करणार मुख्यमंत्र्यांकडे मागणी

पारनेर : (स. गांवकरी)

हक्काच्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरणाऱ्या शेतकऱ्यांची आणि त्यांच्या नेत्यांची पोलिसांच्या माध्यमातून मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न सध्याच्या सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप 'भूमिपुत्र शेतकरी संघटने'चे अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी केला आहे. १५ मे रोजी राज्यात झालेल्या वेगवेगळ्या शेतकरी आंदोलनानंतर आंदोलनकर्त्यांवर पोलीस प्रशासनाने दाखल केलेल्या गुन्ह्यांचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला असून, हे जुलमी गुन्हे शासनाने तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी



त्यांनी केली आहे.

काही दिवसांपूर्वी म्हणजेच १५ मे रोजी नगर-कल्याण महामार्गावर कांद्याला योग्य बाजारभाव मिळावा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी मोठे रस्ता रोको आंदोलन केले होते. त्याच दिवशी मुंबईत आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी आर्थिक मदत मिळावी यासाठी माजी खासदार आणि शेतकरी नेते राजू शेट्टी यांनीही आंदोलन छेडले होते. परंतु, या दोन्ही ठिकाणी आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर आणि नेत्यांवर पोलीस प्रशासनाने गुन्हे दाखल केले. या संपूर्ण प्रकारावर भूमिपुत्र शेतकरी संघटनेने तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या संदर्भात बोलताना संतोष वाडेकर म्हणाले की, आज अत्यंत दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांच्या घामाचे दाम सरकारला देता आलेले नाही. शेतीमालाला कवडीमोल बाजारभाव मिळत असल्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी आपली बाजू सरकारसमोर मांडण्यासाठी रस्त्यावर उतरत आहे. लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आंदोलन केले तरीही जर सरकार गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना जेलमध्ये टाकण्याची भीती दाखवणार असेल, तर हा सरळ सरळ शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा हुकूमशाही प्रयत्न आहे.

वाडेकर यांनी सरकारच्या दुटप्पी धोरणावर टीका करताना स्पष्ट केले की, इतर शासकीय योजनांच्या जाहिरातींसाठी आणि चमकोगिरीसाठी सरकार कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत आहे. परंतु, ज्या बळीराजाच्या जिवावर देश चालतो, त्याच्या शेतीमालाला हमीभाव मिळावा यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना किंवा बजेट सरकारकडे नाही. सरकारने आता तरी डोळे उघडावेत आणि शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळवून देण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, हीच आमची प्रमुख मागणी आहे.

### मुख्यमंत्र्यांची भेट घेणार; तर आंदोलन करू

आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेले सर्व गुन्हे शासनाने तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेने केली आहे. या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात येणार आहे. जर सरकारने गुन्हे मागे घेतले नाहीत आणि शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला, तर आगामी काळात अजून प्रखरपणे रस्त्यावर उतरून शासनाला धारेवर धरू, असा इशारा भूमिपुत्र संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### धोंड्याच्या महिन्यात जावयांची 'चांदी'; सोने-चांदीच्या दरवाढीने चिंता

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरातील सोन्याचांदीचे दुकाने अधिक मास, 'धोंड्याचा महिना' निमित्ताने चांदीचे पैंजण, जोडवी खरेदीसाठी ग्राहकांनी भरलेली दिसत आहेत. अधिक मास, 'धोंड्याचा महिना' हा सण दानधर्मासाठी अत्यंत शुभ मानला जातो. या काळात लेक, जावई आणि इतर नातेवाईकांना सोने-चांदीचे दागिने, भांडी किंवा भेटवस्तू देण्याची महाराष्ट्रात मोठी परंपरा आहे. या महिन्यात लेकीसाठी चांदीचे पैंजण व जोडवी, तर जावयासाठी चांदीचे ब्रेसलेट, चेन, नाणी किंवा चांदीच्या कोल्हापुरी चपला देण्याचा मोठा ट्रेंड आहे. अधिक मासानिमित्त स्थानिक सराफ व्यावसायिक चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर विशेष सवलत देतात. काही दुकानांमध्ये ठराविक खरेदीवर मोफत चांदीची भेटवस्तूही दिली जाते. अनेक नामांकित दुकाने शुद्धतेनुसार दर आकारतात, ज्यामुळे तुमची खरेदी खात्रीशीर होते. अधिक मास म्हणजेच धोंड्याच्या महिन्याला रविवारपासून सुरुवात होताच बाजारपेठेत खरेदीची लगबग वाढली असली, तरी यंदा सोने-चांदीच्या वाढलेल्या दरांमुळे सासरे मंडळींचे आर्थिक गणित चांगलेच कोलमडले आहे. परंपरेनुसार जावयांना सोन्याची अंगठी, चेन, चांदीच्या भेटवस्तू तसेच विविध मानपान देण्याची प्रथा जोपसाताना त्यांच्या खिशाला मोठी झळ बसताना दिसत आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. या काळात मुलीच्या माहेरी जावयाला निमंत्रित करून त्याचा सन्मान केला जातो.

### फक्त रिलीव्हर इनहेलरवर विसंबू नका; दम्यावर लवकर नियंत्रण महत्त्वाचे

पुणे (स. गांवकरी) : दमा हा केवळ अधूनमधून होणारा श्वासाचा त्रास नसून श्वसनमार्गातील सूज (इन्फ्लेमेशन) यामुळे होणारा दीर्घकालीन आजार आहे. त्यामुळे फक्त रिलीव्हर इनहेलरवर अवलंबून न राहता दम्याच्या मूळ कारणावर उपचार करणे आवश्यक असल्याचे मत पुण्यातील फुफ्फुसरोग तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. भारतात अजूनही दम्यावरील उपचार प्रामुख्याने तात्पुरता आराम देणाऱ्या औषधांपुरते मर्यादित असल्याने अनेक रुग्णांचा दमा नियंत्रणात राहत नाही. परिणामी, वारंवार अटॅक येणे, श्वसनाचा तीव्र त्रास वाढणे आणि हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याची वेळ येण्याचा धोका वाढत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे फुफ्फुस प्रत्यारोपण तज्ज्ञ आणि सह्याद्री हॉस्पिटलचे कन्सल्टंट पल्मोनोलॉजिस्ट डॉ. राहुल केंद्रे यांनी सांगितले की, "दम्यावर सुरुवातीपासून योग्य नियंत्रण मिळवले नाही, तर श्वसनमार्गातील सूज आतल्या आत वाढत राहते. यामुळे फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो." दम्यावरील उपचारांमध्ये इन्हेल्ड कॉर्टिकोस्टिरॉईड्स (ICS) आधारित कंट्रोलर इनहेलर्सचा नियमित वापर महत्त्वाचा असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. शॉर्ट-ॲक्टिंग बीटा-ॲगोनिस्ट (SABA) इनहेलर्स तात्पुरता आराम देतात; मात्र ते सूज कमी करत नाहीत. कंट्रोलर इनहेलर्स मात्र सूज नियंत्रणात ठेवून दीर्घकालीन फायदा देतात. श्वास क्लिनिक आणि पुना हॉस्पिटलच्या कन्सल्टंट पल्मोनोलॉजिस्ट डॉ. वृषाली खरीद खडके म्हणाल्या, "रुग्णांना वारंवार रिलीव्हर इनहेलरची गरज भासत असेल, तर त्याचा अर्थ दमा नियंत्रणाबाहेर आहे. अशावेळी नियमित कंट्रोलर इनहेलर्स, डॉक्टरांनी दिलेल्या उपचारांचे पालन आणि वेळोवेळी वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे." लंग इंडिया जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, भारतातील सुमारे ३५ दशलक्ष दमा रुग्णांपैकी ९० टक्के रुग्णांना आवश्यक असलेले आयसीएस उपचार मिळत नाहीत किंवा ते नियमितपणे घेतले जात नाहीत. दरम्यान, ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर अस्थमा (GINA 2026) च्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येही फक्त रिलीव्हर उपचारांऐवजी आयसीएस आधारित उपचारांवर भर देण्यात आला आहे.

### महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

ठाणे (स. गांवकरी) : अनुसूचित जाती / नवबौद्ध तसेच अनुसूचित जमाती / आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी कृषी विभागामार्फत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना" आणि "बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना" प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून सिंचन सुविधा, कृषी यांत्रिकीकरण तसेच जलसंधारणासाठी विविध घटकांवर अनुदान देण्यात येत असून पात्र शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले आहे. या योजनेंतर्गत नवीन सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, पंपसंच, सोलार पंप, एचडीपीई / पीव्हीसी पाईप, ठिबक व तुषार सिंचन संच, बैलचलित व ट्रॅक्टरचलित कृषी अवजारे तसेच परसबाग आदी घटकांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना" आणि "बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना" अंतर्गत नवीन सिंचन विहिरीसाठी कमाल ४ लाख रुपये, जुनी विहीर दुरुस्तीसाठी १ लाख रुपये, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण २ लाख रुपये, इनवेल बोअरिंगसाठी ४० हजार रुपये, पंपसंचसाठी ४० हजार रुपये, सोलार पंपासाठी ५० हजार रुपये, यंत्रसामुग्री ५० हजार रुपये, परसबाग ५ हजार रुपये, एचडीपीई/ पीव्हीसी पाईप ५० हजार रुपये तसेच ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार रुपये आणि तुषार सिंचन संचासाठी ४७ हजार, विज जोडणी आकार २० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत विंधन विहिरीसाठीही ५० हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध आहे.

# वसुंधरा ॲकॅडमीचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

अकोले : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेत अभिनव शिक्षण संस्था संचलित, वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले असून इयत्ता पाचवीचे 22 तर आठवीचे 14 विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वसुंधरा अकॅडमीच्या विहान दत्तात्रय आहेर, ऋत्विक संजय वरसाळे, रुद्र यादव डगळे , साईश आशुतोष देशमुख, कृपा कैलास कांदळकर , हर्षद किशोर वाकचौरे , आयुष चंद्रकांत अहिरे , आराध्या अनिल जाधव, पिया रवींद्र शेवाळे, श्रुती सुंदर येवले , ऋतुजा राजेश शिंदे , वेदत्री दीपक साबळे, इरम आसिफ शेख, वेदांत युवराज आरोटे , ऋतिका संतोष साबळे, अलंकृता गणेश काळे, विपुल राजू सुकटे, स्नेहल विठ्ठल भुसारी, अवनी किरण काकड, ईशान्वी सागर चासकर, सिद्धी अविनाश देशमुख, पृथ्वी बाळासाहेब कोल्हाळ हे 22 विद्यार्थी तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रीतल सतीश चासकर , कस्तुरी दीपक राऊत, समर्थ विलास महाले , सोहम विजय दुर्गुडे, प्रणव प्रशांत बगनर, लावण्या अतुल लोहोटे , नालंदा किरण जाधव, विवेक जगन्नाथ जाधव , ओम विजय साठे , सोहम ऋषिकेश कानवडे, दिशा दशरथ दिवटे, शुभम मनोज पाटील, साईशा वसंत पवार , सर्वेश हौशीराम वर्पे हे 14 विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे वर्गशिक्षक प्राजक्ता नेटके, पुनम शेटे, अण्णासाहेब केदार, नयन वाकचौरे त्याचबरोबर कल्पना मंडलिक, पुष्पा हासे, अरुणा बगनर, उज्वला मुसळे यांचे मार्गदर्शन लाभले. वसुंधरा अकॅडमीच्या या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य डॉ.जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा.डी, सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य राधिका नवले व वसुंधरा अकॅडमीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# संगमनेरच्या कन्येचा विदेशात डंका

## पंतप्रधान मोदी यांचे समोर नॉर्वेत भारतीय नृत्य कला सादर करण्याचा मान



संगमनेर : (स. गांवकरी)

**सावरगाव तळ च्या रेश्मा नेहे यांची कामगिरी**

नॉर्वे देशामध्ये भारताचे पंतप्रधान जागतिक नेते नरेंद्रजी मोदी यांचे समोर नृत्य कला सादर करण्याचा बहुमान संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील रेश्मा नेहे यांना मिळाला हा गौरवास्पद क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच देशांच्या परदेश दौऱ्यावर असून या दौऱ्यात त्यांनी नॉर्वे या देशालाही भेट दिली. या भेटीत राजधानी ओस्लो येथे त्यांना नॉर्वे देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान "ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट "या सन्मानाने सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आपल्या भारतीय सांस्कृतिक पद्धतीने स्वागत करण्यात आले यावेळी नॉर्वे मध्ये भारतीय संगीत व नृत्य यांचे प्रशिक्षण वर्ग चालविण्याऱ्या सौ. रेश्मा नेहे यांच्या चमू ला मिळाला. सांस्कृतिक कार्यक्रमात रेश्मा नेहे आणि त्यांच्या सहकारी यांनी भरतनाट्यम, कुचिपूडी, ओडीसी,कथक आणि मोहिनीपट्टम हे शास्त्रीय नृत्य सादर केले. आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा व परंपरेने केलेल्या विशेष स्वागताने पंतप्रधान मोदीजी अतिशय प्रसन्न व मंत्रमुग्ध झाले. सौ रेश्मा नेहे या सावरगाव तळ ता संगमनेर येथील साहेबराव गेनूभाऊ नेहे पाटील यांच्या पत्नी असून माहेर संगमनेर तालुक्यातील निमज चे शांताराम खंडेराव गुंजाळ यांची कन्या आहे. साहेबराव नेहे हे नॉर्वे देशाची राजधानी ओस्लो येथे एका बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. रेश्मा नेहे यांनी भारतीय शास्त्रीय नृत्य व संगीताचे विशेष शिक्षण उच्च प्रविण्यासह पुर्ण केलेले असून त्या सध्या नॉर्वे देशात आपल्या देशाची सांस्कृतिक विरासत असलेले शास्त्रीय संगीत व नृत्य संवर्धन व प्रसारण कार्य करत आहेत. त्या तेथे आपल्या शास्त्रीय संगीत व नृत्य शिक्षणासाठी "कला नृत्य अकॅडमी " चालवत आहेत. या अकॅडमी द्वारे भरतनाट्यम, ओडीसी, कथक, कुचिपूडी, मोहिनी पट्टम आदी शास्त्रीय नृत्य व संगीताचे प्रशिक्षण देत आहेत.

आमच्या गावातील महिला जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते आणि देशाचे पंतप्रधान मोदीजी यांचे विदेशात तेथील संसदेच्या विशेष सभागृहात स्वागत, सन्मान करण्याचा आणि त्यांना भेटण्याचा बहुमान मिळणं हे आमच्या गावासाठी मानाचा तुरा असून आणि अभिमानाची बाब आहे..!!
**- श्री. गोरक्ष नेहे पाटील, कामगार पोलीस पाटील, सावरगाव तळ**

भारतीय सांस्कृतिक कला ही जागतिक कीर्तीचे नेते अन आपल्या देशाचे मानबिंदू नरेंद्रजी मोदी यांचे समोर विदेशात सादर करण्याचे भाग्य लाभले. मोदीजी नी या कलेचे कौतुक केले हे माझ्या दृष्टीने गौरवास्पद आहे.
**- रेश्मा नेहे, नॉर्वे**

# जुन्नर तालुक्यात जागतिक परिचारिका दिन उत्साहात

*१३ परिचारिकांना 'फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार' प्रदान!*

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

रुग्णसेवेलाच आपले ईश्वरकार्य मानून अहोरात्र सेवा बजावणाऱ्या आणि रुग्णांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या परिचारिकांच्या त्यागाचा व समर्पणाचा गौरव करण्यासाठी जुन्नर येथे 'जागतिक परिचारिका दिना' निमित्त विशेष गौरव सोहळ्याचे शानदार आयोजन करण्यात आले होते.पंचायत समिती आरोग्य विभाग जुन्नर,डिसेंट फाउंडेशन (पुणे) आणि जुन्नर तालुका सर्व परिचारिका भगिनी संयुक्त विद्यमाने महालक्ष्मी मंगल कार्यालय,बारव जुन्नर येथे हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.



या कार्यक्रमाप्रसंगी जुन्नर तालुक्यातील १३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून उत्कृष्ट रुग्ण सेवा करणाऱ्या प्रत्येकी एक अशा एकूण १३ परिचारिकांचा डिसेंट फाउंडेशनच्या वतीने 'फ्लोरेन्स नाइटिंगेल स्मृती आदर्श परिचारिका पुरस्कार २०२६' देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला.कोरोना काळ असो वा दैनंदिन आरोग्य सेवा, स्वतःच्या कुटुंबाची पर्वा नकरता रुग्णांना नवीन आयुष्य देणाऱ्या परिचारिका भगिनींचे कौतुक करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश होता. या सोहळ्यासाठी जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमल शेळकंदे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अश्विनी कुळमेथे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवाई,सचिव डॉ.एफ. बी.आतार,सरपंच नीता ताजने आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.याप्रसंगी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील परिचारिका भगिनी अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. केवळ पुरस्कार वितरणच नव्हे, तर अहोरात्र सेवेत व्यस्त असणाऱ्या परिचारिका भगिनीं ना आनंदाचे काही क्षणमिळावेत यासाठी या सोहळ्यात विविध मनोरंजक खेळ,फॅशनशो आणि लकी ड्रॉ अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमा ची सांगता सर्व उपस्थितांच्या स्नेहभोजनाने झाली

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अमोल पानसरे यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार रंजना कदम सिस्टर यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सुनीता गाडेकर,उज्वला गवळी, अनिता कसार,संगीता बनकर , प्रीती झगडे,डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी,आरोग्य विभागाचे कर्मचारी आणि जुन्नर तालुक्या तील परिचारिका भगिनींनी अथक परिश्रम घेतले.या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल संपूर्ण जुन्नर तालुक्यातून आरोग्य विभागाचे आणि डिसेंट फाउंडेशनचे विशेष आभार मानले जात आहेत.

# ग्राहकांचा वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर टेंभा मोर्चा

अकोले : (स. गांवकरी)

अकोले शहर व तालुक्यातील वीज वितरण कंपनीच्या भोंगळ व ग्राहकविरोधी कारभाराविरोधात आज अकोले येथे संतप्त नागरिक, शेतकरी तसेच विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक टेंभा मोर्चा काढत वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर जोरदार धडक दिली. हातात टेंभे घेऊन "अखंडित वीज मिळालीच पाहिजे", "मनमानी बिलं रद्द करा", "शेतकऱ्यांना नियमित वीज मिळालीच पाहिजे", "बळजबरीने स्मार्ट मीटर बसवून ग्राहकांची पिळवणूक करू नका" अशा घोषणांनी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. तापलेल्या उन्हात असह्य उकाड्याच्या दिवसांत विशेषतः रात्रीच्या वेळी वारंवार खंडित होणारी वीज, शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा न मिळणे, प्रत्यक्ष मीटर रीडिंग न घेता वाढीव वीज बिले आकारणे, तक्रारींकडे अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष आणि ग्राहकांना दिली जाणारी असभ्य वागणूक या प्रश्नांवर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. आंदोलकांनी अकोले उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता नामदेव शेळके यांना धारेवर धरत खडे बोल सुनावले. "ग्राहक नियमित वीज बिल भरतात, तर मग सतत गैरसोय, अंधार आणि अन्याय का सहन करायचा?" असा सवाल उपस्थित केला. यावेळी आंदोलकांनी वीज वितरण कंपनीच्या अकोले कार्यालयाच्या ग्राहक हितविरोधी कारभाराचा तिखट शब्दांत समाचार घेतला. वीज चैनीची वस्तू नसून प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज बनलेली असताना सेवा देण्याऐवजी वीज वितरण कंपनी ग्राहकांची आर्थिक पिळवणूक करून त्रास देत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. उकाड्याच्या दिवसांत रात्री-रात्री वीज गायब होत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, नुकत्याच बाळंत झालेल्या महिला आणि रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही आंदोलकांनी सांगितले.

# चुकीचे व्यक्तव्य करणारा तुषार बोथरा पोलीसच्या ताब्यात

## वंचितचे तीव्र आंदोलन

जामखेड : (स. गांवकरी)

आज दि.19 में 2026 रोजी जामखेड येथील येथील रहिवाशी तुषार बोथरा या इसमाने फेसबुक या सोशल मिडीया प्लॅटफार्मवर एक अत्यंत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक कमेंट केली आहे. सदर कमेंट ही वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव तसेच पक्षाचे राज्याचे नेते आदरणीय सुजात दादा आंबेडकर यांच्याबाबत करण्यात आली आहे. याप्रकरणी वंचित बहुजन आघाडी जामखेड तालुक्याच्या वतीने वंचितचे राज्य प्रवक्ते एडवोकेट डॉ.अरूण (आबा) जाधव यांच्या नेतृत्वाखाली जामखेड पोलिस स्टेशन येथे तीव्र स्वरूपात निदर्शने करून आंदोलन करण्यात आले आहे.या अत्यंत खालच्या पातळीवरील कमेंटमुळे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि वारसाचा घोर अपमान झाला असुन,संपुर्ण आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत.या वादग्रस्त व्यक्तव्यामुळे जामखेड शहर व परिसरातील आंबेडकरी समाजात तीव्र संतापाची लाट असुन,शांतता व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.प्रशासनाने या घटनेचे गांभीर्य ओळखून कायदा व सुव्यवस्था बिघडण्यापूर्वी सदर इसम तुषार बोथरा याच्यावर आयटी अँक्ट



व संबंधित कायदेशीर कलमांनुसार तात्काळ गुन्हा दाखल करावा आणि त्याला ताब्यात घ्यावे.अशी मागणी वंचित बहुजन आघाडी जामखेड तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे.जर या इसमावर त्वरित कडक कार्यवाई झाली नाही तर वंचित बहुजन आघाडी व समस्त आंबेडकरी जनतेच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल,ज्याची सर्वस्वी जबाबदारी पोलिस प्रशासनाची राहील असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या या तीव्र आंदोलनामुळे जामखेड पोलिसांनी तातडीने दखल घेऊन सदर आरोपी तुषार बोथरा याला अटक केली आहे.वंचितच्या या तीव्र आंदोलनाला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट),संभाजी ब्रिग्रेड,मुस्लिम पंच कमिटी,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे युवा मंच,ओबीसी संघटना आदिंनी जाहीर पाठिंबा देत सदरील घटनेचा निषेध केला आहे.या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते नगरसेवक एडवोकेट डॉ.अरूण (आबा) जाधव,जामखेड नगरपरिषदेच्या नगसेविका सौ.संगिताताई भालेराव,नगरसेवक प्रशांत राळेभात,नगरसेवक वसीम सय्यद,मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अझहरभाई काझी,संभाजी बिग्रेडचे अवधूत पवार,वकील बार संघटनेचे अध्यक्ष एडवोकेट हर्षल डोके,भारतीय बौध्द महासंघाच्या सुरेखाताई सदाफुले,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे युवा मंचचे अध्यक्ष गणेश जाधव,सामाजिक कार्यकर्ते पत्रकार रिजवान बागवान,लोकअधिकार आंदोलनाचे बापू ओव्हळ,मुख्तार सय्यद,जुबेर शेख,अंकल घायतडक,नितिन जाधव,सतिष जाधव,परशुराम,जाधव,आदिल शेख,दिलिप गायकवाड,सुमित भालेराव,अक्षय समुद्र,मनोज घायतडक,शेखर कांबळे,योगेश बनसोडे,आरीफ बागवान,सुभाष फुलमाळी सर,विक्की गायकवाड,गणेश घायतडक,बाबा ओव्हळ,अनिल सदाफुले,सागर कांबळे आदि.पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येंने उपस्थित होते. या आगोदरही मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यात ही समाजाच्या भावना दुखतील असे या तुषार बोथरा यांनी वक्तव्य वापरले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### निवडणूक कामकाजात हलगर्जीपणा; मनपा कर्मचाऱ्याविरूध्द गुन्हा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मतदार यादी अद्ययावतीकरण व मतदार मॅपिंगच्या महत्त्वाच्या निवडणूक कामकाजात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत नगर महानगरपालिकेतील एका कर्मचाऱ्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र फुलारी (रा. नय्यर शाळेसमोर, पाईपलाईन रस्ता, सावेडी) असे गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. यासंदर्भात सुनील नेटके (वय ४३, रा. शेंडी) यांनी फिर्याद दिली आहे. ते पेमराज सारडा कॉलेजमध्ये ग्रंथालय लिपीक म्हणून कार्यरत असून सध्या २२५ नगर शहर विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यक्रमांत १० बीएलओ कार्यरत असून निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अद्ययावत करणे व मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर सावेडी परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी क्रमांक २३ म्हणून कार्यरत असलेले मनपा कर्मचारी राजेंद्र फुलारी यांच्यावर निवडणूक विषयक कामात विलंब, टाळाटाळ, दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्याची सन २०२३ पासून बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांच्यावर मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्निरिक्षणाचे काम सोपविण्यात आले होते. फिर्यादीनुसार, फुलारी यांनी १६ एप्रिल २०२६ पासून निवडणूक कामकाज करण्यास टाळाटाळ केली. त्यांना वेळोवेळी बैठका घेऊन तसेच लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. ११ मे २०२६ रोजी कामावर हजर राहून कामात सुधारणा करण्याबाबत लेखी आदेश देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही संबंधितांनी मतदार मॅपिंगचे कोणतेही काम पूर्ण केले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### साकुरीतील क्लबवर छापा, रम्मी जुगार खेळताना तिघे रंगेहात ताब्यात

राहाता (स. गांवकरी) : राहाता पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांनी अवैध व्यवसायांविरोधात धडाकेबाज मोहीम सुरू केली असून त्याअंतर्गत साकुरी येथील हॉटेल आठवण येथे सुरू असलेल्या कथित क्लबवर छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत रम्मी जुगार खेळताना तिघांना रंगेहात पकडण्यात आले. दि. १७ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी साकुरी येथील हॉटेल आठवण येथे धाड टाकली. यावेळी आरोपी दत्तात्रय सूर्यभान भोंगळ (रा. पिंपळस), किशोर विठ्ठल भंगणे (रा. राहाता) आणि संजय दत्तात्रय राऊत (रा. बेलापूर) हे विनापरवाना बेकायदेशीरपणे रम्मी जुगार खेळताना आणि खेळविताना आढळून आले. या छाप्यात पोलिसांनी आरोपींकडून ४१ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात रोख रक्कम, जुगारासाठी वापरलेले ५२ पत्ते तसेच १० हजार रुपये किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी राहाता पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. नं. १९५/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका डी. के. अभंग आणि पोलिस पथकाने सहभाग घेतला. पुढील तपास पोहेका अभंग करीत आहेत.

### लग्नसमारंभात महिलेशी गैरवर्तन करत ॲसिड टाकून जाळण्याची धमकी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सीटी लॉन्स येथील लग्नसमारंभात महिलेशी गैरवर्तन करत तिच्या नणंदेच्या मुलाला हिसकावून नेण्याचा प्रयत्न झाल्याची घटना सोमवारी (१८ मे) रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी मुकुंदनगरच्या दोघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नाशिक येथील ३१ वर्षीय पीडिताने मंगळवारी (१९ मे) पहाटे फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या नणंदेचे मुकुंदनगर येथील व्यक्तीशी लग्न झाले असून त्यांना तीन वर्षांचा मुलगा आहे. कौटुंबिक वादामुळे नणंद सध्या मुलासह नाशिक येथे माहेरी राहत आहे. सोमवारी फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय नातेवाईकांच्या लग्नासाठी येथील सीटी लॉन्स येथे आले होते. रात्री १० वाजेच्या सुमारास नणंदेचा पती हा तेथे आला आणि मुलाला माझ्या ताब्यात द्या अशी मागणी करू लागला. त्यावेळी फिर्यादीच्या सासऱ्यांनी त्याला समजावून सांगत तू नाशिकला ये, येथे मुलाला घेऊन जाऊ नको असे सांगितले. मात्र त्याने तुम्ही बाहेर या, तुम्हाला दाखवतो अशी धमकी देत तेथून निघून गेला. यानंतर रात्री ११ वाजता फिर्यादी या मुलाला सोबत घेऊन पार्किंगकडे जात असताना संशयित पुन्हा सीटी लॉन्सच्या गेटवर आला. त्याने मुलाला जबरदस्तीने हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने विरोध केला असता त्याने शिवीगाळ केली. तसेच फिर्यादीसोबत गैरवर्तन केले.

# जयदरला शॉर्टसर्किटमुळे पाच टपऱ्यांना भीषण आग

**१५ ते २० लाखांचे नुकसान, चार तरुणांचा उदरनिर्वाह धोक्यात**



कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील जयदर गावात मंगळवारी पहाटे शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून रस्त्यावरील पाच टपऱ्या जळून खाक झाल्या. या दुर्घटनेत किराणा दुकान, मोबाईल दुकान व ऑनलाइन साहित्य विक्रीच्या टपऱ्यांसह अंदाजे 15 ते 20 लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. चार सुशिक्षित तरुणांनी उभारलेला व्यवसाय डोळ्यादेखत उध्वस्त झाल्याने त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

जयदर येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास एका टपरीतून अचानक धूर येऊ लागला व काही क्षणातच आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली व शेजारील इतर चार टपऱ्यांनाही तिने विळखा घातला. आग एवढी भीषण होती की अर्ध्या तासातच पाचही टपऱ्या पूर्णपणे जळून खाक झाल्या.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. कळवण नगरपंचायतीचा अग्निशमन बंबही घटनास्थळी दाखल झाला. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, मात्र तोपर्यंत टपऱ्यांमधील सर्व साहित्य जळून गेले होते. मोबाईल दुकानातील इलेक्ट्रॉनिक साहित्य, किराणा माल व इतर वस्तू पूर्णपणे भस्मसात झाल्या. जयदर गावातील जीवा गांगुर्डे, भीवा गांगुर्डे, सागर पवार व सागर गायकवाड या चार सुशिक्षित होतकरू तरुणांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी छोटेखानी व्यवसाय सुरू केला होता. किराणा, मोबाईल रिपेअरिंग, रिचार्ज व ऑनलाइन सेवा केंद्र अशा टपऱ्या टाकून ते स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करत होते.

"नोकरी मिळत नाही म्हणून आम्ही चौघांनी मिळून कर्ज काढून दुकाने टाकली. हळूहळू व्यवसाय वाढत होता. पण पहाटे आलेल्या आगीने आमचे स्वप्नच जाळून टाकले. दुकानातला एकही रुपयाचा माल वाचला नाही. आता कर्ज कसे फेडायचे आणि घर कसे चालवायचे, हा प्रश्न पडला आहे," असे सागर पवार यांनी डोळ्यात पाणी आणून सांगितले. प्राथमिक अंदाजानुसार या आगीत पाचही टपरीधारकांचे मिळून 15 ते 20 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मोबाईल दुकानातील नवीन हँडसेट, ॲक्सेसरीज, किराणा दुकानातील संपूर्ण माल, फर्निचर व रोख रक्कम आगीत जळून गेली. कोणतीही विमा संरक्षण नसल्याने या तरुणांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे.

या दुर्घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. "शिक्षित तरुणांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी केलेला प्रयत्न आगीत भस्म झाला. शासनाने तातडीने या तरुणांचे पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी," अशी मागणी जयदर ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामीण भागात वीज यंत्रणेच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याने अशा घटना घडत आहेत. टपऱ्यांमधील वायरिंग जुने व निकृष्ट दर्जाचे असल्याने शॉर्टसर्किटचा धोका वाढतो. याबाबत जनजागृती व विद्युत सुरक्षा तपासणी मोहीम राबवण्याची गरज ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत अगस्ती विद्यालयाची चमकदार कामगिरी

अकोले : (स. गांवकरी)

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती विद्यालय अकोले विद्यालयाने नुकतीच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल अत्यंत चमकदार लागला असल्याने विद्यालयाने शिष्यवृत्ती निकालाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी पूर्व उच्च प्राथमिक इयत्ता 5 वीतील 25 विद्यार्थी तर पूर्व माध्यमिक इयत्ता 8 वीतील 17 विद्यार्थी पात्र ठरले. पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत उगले अन्वी विजय, तातळे गौरी बाळू, बांबळे विनोद एकनाथ, मेंगाळ स्वरा सोमनाथ, बढे आरोही विजय, साबळे स्वरा अविनाश, वायाळ वेदांत राजू, शितोळे आदित्य रामचंद्र, घनकुटे स्वरा काशिनाथ, कानवडे ईश्वरी रेवणनाथ, इरनक ओंकार लालू, कानवडे संस्कार भानुदास, दराडे जितेश्री अभिजित, डहाळे कृष्णा सोमनाथ, जगताप करण राजेंद्र, नेहे क्षितिज विष्णू, शेणकर मनिष विशाल, सोनवणे प्रज्ञेश प्रदीप, मेंगाळ श्रेया शिवाजी, जगदाळे आर्या गणेश, शेख आलीना बबलू तसेच पूर्व माध्यमिक परीक्षेत भोजने तन्मय मनोहर, उगले श्रेया महेश, आव्हाड विहान दत्तात्रय, सहाणे मैत्रीई निलेश, फरगडे तन्वी बळीराम, गवांदे राजवर्धन ज्ञानदेव,पोखरकर सर्वेश राजू, उगले समृद्धी योगेश, चौधरी साक्षी भास्कर, देशमुख अनुष्का नितीन,शेख उजेफ मोसिन, इरनक सोहम लालू, मोरे सिद्धी विकास, हांडे कार्तिकी भीमाशंकर, पोखरकर कृष्णा गणेश, ठावरे साहिल राजेंद्र, होलगीर आदिती दिलीप या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जादा तासांचे नियोजन,नियमित सराव परीक्षा, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन आदी उपक्रम राबविल्याने हे यश मिळाले असल्याचे विद्यार्थ्यांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले.

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना आ. दातेंच्या धडपडीमुळे यश

### पारनेर व नगर तालुक्यातील २८ गावांना मदतीचा दिलासा



> पारनेर तालुक्यात २३ गावांतील ४ हजार ८६९ शेतकरी बाधित झाले असून ३ हजार ३६९.०७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले होते. त्यासाठी सुमारे ५ कोटी ७८ लाख रुपयांच्या मदतीची मागणी करण्यात आली होती. तसेच अहिल्यानगर तालुक्यातील ५ गावांतील ६४३ शेतकऱ्यांचे ४९८.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते त्यासाठी ८५ लाख रुपयांहून अधिक मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता दोन्ही प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांना संबंधित अनुदान लाभ मिळणार आहे.
>
> **- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

पारनेर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नैसर्गिक संकटात बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळावी यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत प्रभावी प्रयत्न केले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० गावांमधील तब्बल २७ हजार ६०२ शेतकरी बाधित झाले असून १४ हजार ३४९.३७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी सुमारे २५ कोटी २० लाख रुपयांच्या जो मदतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता त्यास मंजुरी मिळाली आहे.

पारनेर व अहिल्यानगर तालुक्यातील एकूण २८ गावांतील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी प्रशासन व शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी चर्चा करून प्रस्ताव गतीने पुढे नेण्यास महत्त्वाची भूमिका बजावली. संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे नेतृत्व म्हणून आमदार काशिनाथ दाते सर यांची भूमिका यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाची मदत लवकरात लवकर मिळावी, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरूच असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात सहा वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू

- खा. निलेश लंके यांनी केली सखोल चौकशी

**या संपूर्ण प्रकरणात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत**

- सर्व रिपोर्ट नॉर्मल असताना अचानक अशी गंभीर प्रतिक्रिया कशी झाली?
- ऑपरेशनपूर्वी आवश्यक काळजी आणि वैद्यकीय प्रोटोकॉल पाळले गेले होते का?
- मुलीची प्रकृती बिघडत असताना पालकांना तातडीने माहिती का देण्यात आली नाही?
- पालकांना न सांगता मुलीला आयसीयू मध्ये हलवण्याची वेळ का आली?
- उपचार प्रक्रियेत कोणतीही निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा झाला का?

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पुन्हा एकदा अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील एक ६ वर्षांची मुलगी डोळ्यांच्या तिरळेपणाच्या शस्त्रक्रियेसाठी दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल झाली होती. मात्र शस्त्रक्रिया चालू असताना ती अत्यवस्थ झाली आणि नंतर तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनं मंगेशकर रुग्णालयातील कारभार पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. नगरचे खासदार निलेश लंके यांनी या दुर्दैवी घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. दोषी आढळणाऱ्या डॉक्टर, कर्मचारी किंवा हॉस्पिटल प्रशासनावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. खासदार लंके यांनी म्हटले आहे की,माझ्या अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील सुपा, पारनेर येथील रहिवाशी असलेली प्रियांशी बागडे ही अवघी ६ वर्षांची चिमुरडी डोळ्यात तिरळेपणाचा त्रास असल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आली होती. रुग्णालय प्रशासनाने सर्व वैद्यकीय तपासण्या आणि रिपोर्ट पूर्णपणे नॉर्मल असल्याचे सांगत पालकांना शस्त्रक्रियेसाठी परवानगी दिली होती. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार पालकांनी पूर्ण विश्वास ठेवून आपल्या निष्पाप मुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. ठरल्याप्रमाणे काल शस्त्रक्रियेसाठी प्रियांशीला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. मात्र ऑपरेशन सुरू होण्यापूर्वीच तिच्या डोळ्यांमध्ये ड्रॉप टाकल्यानंतर अचानक तिची प्रकृती गंभीररीत्या बिघडली आणि तिला रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, पालकांना कोणतीही माहिती न देता तिला तातडीने आयसीयू मध्ये हलवण्यात आले. परिस्थिती इतकी गंभीर असतानाही कुटुंबाला अंधारात ठेवण्यात आले. पालकांना नंतर फक्त “मुलीची तब्येत अचानक बिघडली असून आम्ही CPR देत आहोत” एवढीच माहिती देण्यात आली. मात्र काही वेळातच त्या निष्पाप ६ वर्षांच्या चिमुरडीने अखेरचा श्वास घेतला. उपचारासाठी विश्वासाने आलेल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका निष्पाप चिमुरडीचा जीव गेला आहे. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेऊन सरकारने आणि आरोग्य विभागाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या डॉक्टर, कर्मचारी किंवा हॉस्पिटल प्रशासनावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी हीच आमची मागणी आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी रुग्णालय व्यवस्थेची जबाबदारी निश्चित होणे अत्यावश्यक आहे.


## काजवा महोत्सवासाठी गर्दी; निसर्ग संवर्धनासाठी काळजी घेण्याचे आवाहन!

अकोले : (स. गांवकरी)

पावसाळ्याच्या सुरुवातीला सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये, जंगल परिसरात आणि ग्रामीण भागात रात्रीच्या अंधारात चमचमणारे लाखो काजवे सध्या पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहेत. “काजवा महोत्सव” अनुभवण्यासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात पर्यटक विविध पर्यटनस्थळांवर भेट देत आहेत. मात्र, वाढती गर्दी आणि काही ठिकाणी पर्यटकांकडून होणारा निष्काळजीपणा काजव्यांच्या अस्तित्वासाठी धोकादायक ठरत असल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. काजवे हे जैवविविधतेचे महत्त्वाचे घटक मानले जातात. स्वच्छ वातावरण, ओलसर जंगल परिसर आणि नैसर्गिक अधिवास असलेल्या भागात काजवे मोठ्या प्रमाणात आढळतात. विशेषतः मे अखेर ते जून महिन्याच्या सुरुवातीपर्यंत काजव्यांची संख्या वाढलेली दिसते. नर काजवे मादीला आकर्षित करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा प्रकाश निर्माण करतात. निसर्गातील हा अद्भुत प्रकाशमहोत्सव पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने जंगल भागात पोहोचत आहेत. मात्र, अनेक ठिकाणी मोबाईल फ्लॅश, तेज टॉर्च, डीजे, मोठा आवाज, वाहनांचे हेडलाईट आणि प्लास्टिक कचरा यामुळे काजव्यांच्या जीवनचक्रावर परिणाम होत असल्याचे पर्यावरण अभ्यासक सांगतात. कृत्रिम प्रकाश आणि ध्वनी प्रदूषणामुळे काजव्यांच्या प्रजनन प्रक्रियेला मोठा फटका बसत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पर्यटकांनी निसर्ग पर्यटन करताना जबाबदारीने वागण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पर्यटकांनी मोबाईल फ्लॅश, टॉर्च व तेज प्रकाशाचा वापर टाळावा, काजव्यांना हात लावणे किंवा पकडण्याचा प्रयत्न करू नये, जंगल परिसरात मोठा आवाज, डीजे किंवा आरडाओरडा करू नये तसेच प्लास्टिक, पाण्याच्या बाटल्या आणि इतर कचरा टाकू नये.

# वरखेडा-कोसुर्डे पुलाची दयनीय अवस्था : ठिकठिकाणी भेगा, गंजलेले गज उघडे

- वाळू माफियांची मुजोरी वाढली
- प्रशासनाच्या दुर्लक्षावर काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांचा संताप, आंदोलनाचा इशारा



कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील वरखेडा ते कोसुर्डे या गावांना जोडणाऱ्या पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पुलाला ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडल्या असून, स्लॅबमधील गंजलेले लोखंडी गज उघडे पडले आहेत. जीर्ण झालेला हा पूल कधीही कोसळेल, अशी भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांनी स्वतः पुलाची पाहणी करून प्रशासनाच्या दुर्लक्षावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

पुलाची भयावह स्थिती वरखेडा-कोसुर्डे हा पूल परिसरातील १० ते १२ गावांसाठी दळणवळणाचा मुख्य मार्ग आहे. रोज शेकडो वाहने, दुचाकी, शेतमालाची वाहतूक करणारे ट्रॅक्टर व शाळेच्या बसेस याच पुलावरून जा-ये करतात. मात्र पुलाच्या स्लॅबला मोठ्या भेगा गेल्या आहेत. पिलरजवळील काँक्रीट ढासळून आतले गंजलेले गज पूर्णपणे उघडे पडले आहेत. पावसाळ्यात तर पुलावरून पाणी वाहते. अशा अवस्थेतून प्रवास करणे म्हणजे जीव मुठीत धरून जाण्यासारखे आहे, अशी व्यथा ग्रामस्थांनी मांडली.

आमची मुले याच पुलावरून रोज शाळेच्या बसने जातात. पुलाकडे बघितले की काळजात धस्स होते. कधी काय होईल सांगता येत नाही, असे कोसुर्डे येथील पालक यांनी सांगितले. काँग्रेसचे तालुका अध्यक्ष के. के. गांगुर्डे यांनी शुक्रवारी कार्यकर्त्यांसह सदर पुलाची पाहणी केली. यावेळी त्यांनी पुलाच्या दयनीय अवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "पुलाची अवस्था अत्यंत भयावह आहे. आम्ही गेल्या दोन वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसील कार्यालयाला वारंवार पत्रव्यवहार केला, निवेदने दिली. प्रत्यक्ष भेटून कळवलेही, मात्र झोपेचे सोंग घेतलेले प्रशासन कधी जागे होणार?" असा संतप्त सवाल गांगुर्डे यांनी उपस्थित केला. "एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? या पुलावरून रोज शाळेच्या बसेस जातात. शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. प्रशासनाने तातडीने या पुलाची स्ट्रक्चरल ऑडिट करून दुरुस्ती करावी किंवा नवीन पूल मंजूर करावा. अन्यथा काँग्रेस पक्ष व ग्रामस्थांच्या वतीने याच पुलावर रास्ता रोको आंदोलन केले जाईल," असा सज्जड इशारा गांगुर्डे यांनी दिला.

या पुलाच्या आजूबाजूला आणखी एक गंभीर समस्या उभी राहिली आहे. पुलाच्या खालून व वरून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. दिवसाढवळ्या ट्रॅक्टर वरून वाळूची वाहतूक करताना दिसतात. पुलाच्या पिलरजवळूनच वाळू काढल्याने पुलाच्या पायाला धोका निर्माण झाला आहे.

वाळू माफियांवर प्रशासनाचा कुठलाही वचक राहिलेला नाही. महसूल, पोलीस व पाटबंधारे विभाग एकमेकांकडे बोट दाखवतात. यामुळेच या माफियांची मुजोरी वाढली आहे. पुलाच्या पायाशीच खड्डे खोदल्याने पूल कधीही खचू शकतो, असा आरोप वरखेडा येथील ग्रामस्थांनी केला.

पुलाच्या अवस्थेमुळे व वाळू माफियांच्या दहशतीमुळे परिसरातील ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. "रात्री-अपरात्री वाळूच्या ट्रॅक्टर सुसाट वेगाने जातात. आवाज केला तर धमक्या दिल्या जातात. आम्ही तक्रार तरी कुणाकडे करायची?" असा प्रश्न येथील नागरिकांनी उपस्थित केला. मात्र, प्रत्यक्षात जोपर्यंत ठोस कृती होत नाही, तोपर्यंत नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. प्रशासनाने वेळीच उपाययोजना न केल्यास मोठी दुर्घटना अटळ आहे, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे.

# स्वीकृत सदस्यपदी डॉ. संदीप पचलिंग व ऋषिकेश पारवेकर बिनविरोध

**मुदखेड : (स. गांवकरी)**

नगरपरिषदेच्या निवडणुकीनतर बहुप्रतिक्षित निवडणुकीनंतर बहुप्रतीक्षेत आणि राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या स्वीकृत सदस्य नगरसेवक पदाच्या निवड प्रक्रियेला अखेर १८ मे रोजी पूर्णविराम मिळाला. भारतीय जनता पक्षाच्या वर्चस्वाखाली असलेल्या नगरपरिषदेत स्वीकृत सदस्यपदी कार्यकुशल व सर्वसमावेशक नेतृत्व डॉ. संदीप शंकरराव पचलिंग आणि भाजपा युवा कार्यकर्ते ऋषिकेश पारवेकर यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.



नगरपरिषदेची विशेष सभा नगराध्यक्षा सौ. विश्रांतीताई माधव पाटील-कदम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजीयाताई चव्हाण यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडल्याचे स्पष्ट झाले.

डॉ. संदीप पचलिंग हे सामाजिक कार्य आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे शहरात परिचित व्यक्तिमत्त्व मानले जाते. तर ऋषिकेश पारवेकर यांनी भाजपाच्या युवक संघटनांमध्ये सक्रिय कार्य करत पक्षनिष्ठा जपली आहे. त्यामुळे या दोन्ही नावांवर पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केल्याचे मानले जात आहे.

निवड प्रक्रियेसाठी पक्ष निरीक्षक म्हणून नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे नगरसेवक किशोर स्वामी तसेच भाजपा गट व सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे भोकरचे सक्रिय भाजपा कार्यकर्ते नगरसेवक युसूफ भाई यांच्या प्रमुख उपस्थितीत संपूर्ण निवड प्रक्रिया शांततेत आणि बिनविरोध पार पडली. दरम्यान, स्वीकृत सदस्यपदासाठी शहरातील भाजपातील अनेक इच्छुक कार्यकर्ते प्रयत्नशील होते. मात्र जागांची मर्यादित संख्या लक्षात घेता पक्षाने निवडक नावांनाच संधी दिली. त्यामुळे काही इच्छुकांच्या आशांवर पाणी फेरले असले तरी पक्ष नेतृत्वाच्या निर्णयाला सर्वांनी मान्यता दिल्याचे दिसून आले. डॉ. संदीप पचलिंग आणि ऋषिकेश पारवेकर यांच्या निवडीमुळे शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात नगरपरिषदेच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी प्रभारी मुख्याधिकारी जगदीश दळवी, माजी उपनगराध्यक्ष माधव पाटील कदम, भाजपाचे गटनेते तथा माजी नगराध्यक्ष सुनील शेटे नगरपरिषदेचे उपाध्यक्ष इम्रान शेठ मच्छीवाले, भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक रामसिंग नगरपरिषदेचे पाणीपुरवठा सभापती शाम चंद्रे, नगरसेवक उपेंद्र देवदे, नितीन चौदंते, संजय आऊलवार, प्रभाकरपांचाळ, संजय सोनटक्के, संदीप मोडवान, अब्दुल सलाम, प्रकाश बल्पेवाड, एकबाल कुरेशी, रामराव खांडरे, बजरंग खोडके, नीलकंठ पडोळे, नईम बागवान, माधव चमकुरे, मो. युसूफ आदींची उपस्थिती होती.

दरम्यान नगरपरिषदेच्या सभागृहात दोन्ही नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले.

## थोडक्यात बातम्या...

### विलास गजभारे यांना छ. राजर्षी शाहू महाराज समाज भुषण पुरस्कार जाहीर



नवीन नांदेड (स. गांवकरी) : सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे यांना अण्णा भाऊ साठे पिपल्स फोर्स यांच्या वतीने देण्यात येणारा'छ. राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार 2026' घोषीत करण्यात आला असून सदरील पुरस्कार 26 जुन रोजी सिडको येथे एका कार्यक्रमात मान्यवराचा उपस्थितीत देण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सिडको परिसरासह सामाजिक राजकीय सांस्कृतिक शैक्षणिक कार्यात सक्रिय सहभागी होऊन अनेक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'छ. राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार 2026' साठी आपली निवड करण्यात आली आहे. फुले-आंबेडकरी चळवळीतील समाज भुषण पुरस्कार साठी निवड करण्यात आली आहे,त्यामध्ये आपण जे काही निःस्वार्थ भावनेने उल्लेखनीय असे योगदान दिलेले आहे. त्याची दखल घेऊन या पत्राद्वारे 2026 च्या छ. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी आपली निवड झाल्याची घोषांना केली आहे, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र (प्रमाणपत्र स्वरूप असून हा छ.शाहुमहाराज जयंती निमित्त नवीन नांदेड, सिडको येथे एका कार्यक्रमात संपन्न देण्यात येणार आहे.

### भक्तीचा स्पर्श; 'कृष्णावतारम्' ठरला वर्षातील सर्वात चर्चित चित्रपट



पुणे (स. गांवकरी) : भगवान श्रीकृष्णांच्या जीवनावर आधारित कृष्णावतारम् या चित्रपटाने सध्या देशासह जगभरात अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली आहे. भव्य दृश्यरचना, प्रभावी कथानक आणि भक्तीभावाने परिपूर्ण सादरीकरणामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत असून बॉक्स ऑफिसवरही विक्रमी कमाई करत आहे. भारतातील एकूण ग्रॉस कमाई ₹२४.८१ कोटींवर पोहोचली असून एकूण नेट कलेक्शन ₹२०.९६ कोटी इतके झाले आहे. गेल्या काही दिवसांत चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली असून अनेक ठिकाणी हाऊसफुल्ल शो सुरू आहेत. विशेष म्हणजे हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रेक्षकांना एक आध्यात्मिक अनुभूती देत आहे. थिएटरमध्ये श्रीकृष्णांच्या भजनांचा गजर, भावनिक प्रसंगांदरम्यान प्रेक्षकांचे अश्रू आणि आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळत आहे. हिंदीसोबतच तेलुगू आणि तमिळ भाषांतील आवृत्त्यांनाही प्रचंड प्रतिसाद मिळत असून भारताबाहेरील कॅनडा, दुबई, फ्रान्ससारख्या देशांमध्येही चित्रपटाची मोठी चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर चित्रपटाविषयीचे व्हिडिओ, प्रतिक्रिया आणि भक्तीमय वातावरण मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अनेक आध्यात्मिक गुरूंनी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी चित्रपटाचे कौतुक केले असून हा चित्रपट भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि कुटुंबव्यवस्थेला नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. कृष्णावतारम् आता केवळ एक चित्रपट नसून भक्ती, भावना आणि संस्कृतीचा जागतिक उत्सव बनला आहे.

### 'जेईई'-'नीट' पूर्व प्रशिक्षण ऑनलाईन अर्ज करण्याचे वारे यांचे आवाहन

खोडद (स. गांवकरी) : अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मार्फत राज्यातील अनुसूचित जातीतील मातंग व त्यातील तत्सम जातींच्या विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणासाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे मोफत अनिवासी ऑफलाईन प्रशिक्षण नामांकित खाजगी संस्थांमार्फत दिले जाणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांकडून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे. सन 2026-27 ते 2027- 28 या दोन वर्षांच्या कालावधीसाठी हे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांना दरमहा 6 हजार रुपये विद्यावेतन, एक वेळ पुस्तक संचाकरीता 5 हजार रुपये तसेच नामांकित कोचिंग क्लासेसची पुर्ण फी त्या संस्थेला दिली जाणार आहे.

### बोव्हाईन ब्रिडींग ऍक्टची प्रभावी अंमलबजावणी करा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत. राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल.

# काष्टीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

## सहकार महर्षी काष्टी संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे जनता विद्यालय, कन्या विद्यालय, नवभारत विद्यालय, परिक्रमा संकुल यामध्ये इयत्ता दहावी मध्ये 85 ते 100 टक्के पर्यंत गुण मिळवून चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झालेल्या मुल व मुली अशा एकूण 39 गुणवंत विद्यार्थ्यांचा सहकार महर्षी काष्टी संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सन्मान करुण विद्यार्थ्यांच्या पाठिवर शाबासकीची थाप दिल्याने त्यांना भविष्यातीर जीवनात नवी उर्जा मिळाली आहे. दि.18 रोजी तालुक्यातील काष्टी येथे सकाळी 11 वाजता सहकार महर्षी काष्टी संस्थेच्या सहकार सभागृहात जेष्ठ नेते कैलासतात्या पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात 39 गुणवंत विद्यार्थ्यांचा विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार करुण सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, माजी अध्यक्ष ॲड.विठ्ठलराव काकडे,शिवाजीराव पवार, काशिनाथ काळे,दादासाहेब कोकाटे, बाळासाहेब पाचपुते, लक्ष्मणराव पाचपुते, पोपटराव पाचपुते, सुभाष पाचपुते, सर्जेराव पाचपुते, संतोष माणिकराव पाचपुते, जयसिंग पाचपुते, यांच्यासह पदाधिकारी हजर होते.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते म्हणाले कि आजचा विद्यार्थी हे आमचे उद्याचे मोठे भविष्य आहे. कारण आम्ही पूर्वी शिक्षणाच्या योग्य सुविधा नसताना घडलो.परंतु आता शिक्षणासाठी अनेक सुविधा असताना आपला विद्यार्थी शाळेमध्ये



गुरुचे चांगले आणि आदर्श ज्ञानदान घेऊन तो उद्याचा शास्त्रज्ञ, तसेच देश हितासाठी वेगवेगळ्या पदावर जावून अधिकारी होईल. तेव्हा आपल्या गावातील विद्यार्थी म्हणून आम्हाला आणि गावाला अभिमान वाटेल हेच सर्व होण्यासाठी तुम्हाला नवी उर्जा मिळण्यासाठी आम्ही ह्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले. जीवनात प्रत्येक आईवडिलांचे स्वप्न मुलांनी साकार करुण यशस्वी व्हावे याच सर्वांना शुभेच्छा आहेत असे पाचपुते म्हणाले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक व मुख्याध्यापक यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी मंगल जोगदंड, हरिचंद्र शिंदे, सतिष शिंदे, निवृत्ती शेलार, माऊली माने,दिगंबर नलवडे, योगेश दांगट, नामदेव गावडे. यांच्यासह संस्थेचे सभासद, शिक्षक, पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. संचालक विठ्ठलराव काकडे यांनी प्रास्ताविक करुण सचिव गणेश पाचपुते यांनी आभार मानले. काष्टी गावातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी मध्ये अतिशय चांगले गुण मिळवून बाजी मारली.

# इंदिरा गांधी पॉलिटेक्निक बेलवंडी शुगर येथे प्रवेश प्रक्रिया केंद्र सुरू

**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रवेश प्रक्रिया केंद्र म्हणून इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी शुगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष पॉलिटेक्निक ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने ही सुविधा दिनांक २० मेपासून सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी २२ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी व कागदपत्र पडताळणी पूर्ण करावी, अशी माहिती प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. संस्थेमध्ये अद्ययावत संगणकीय प्रयोगशाळा, उच्च क्षमतेची इंटरनेट सुविधा तसेच प्रशिक्षित व विद्यार्थ्यांशी प्रभावी संवाद साधणारा प्राध्यापक वर्ग उपलब्ध असल्याने या केंद्राची निवड करण्यात आली आहे. डॉ. भोईटे यांनी सांगितले की, भारतीय नागरिकत्व असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाणार आहे. दहावीचे निकाल जाहीर झाले असले तरी विद्यार्थ्यांकडे मूळ गुणपत्रिका उपलब्ध नसल्याने ऑनलाईन नोंदणीसाठी फक्त बोर्डाकडून प्राप्त आसन क्रमांक किंवा ऑनलाईन मार्कशीटची प्रत देणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांचे गुण सॉफ्टवेअरद्वारे आपोआप ऑनलाईन अर्जात नोंदवले जाणार आहेत. हा नियम सीबीएसई मंडळाच्या विद्यार्थ्यांनाही लागू राहणार आहे. पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश परीक्षा नसल्यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक तणाव कमी झाला आहे.

# शेततळ्यात पडून ३६ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**कोतुळ : (स. गांवकरी)**

कोतुळपासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावरील भांगेवाडी येथे ३६ वर्षीय युवकाचा शेततळ्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मयत युवकाचे नाव पोपट रावजी धराडे (वय ३६) असे असून ते कोतुळ आदिवासी सोसायटीचे माजी चेअरमन रावजी गोपळा धराडे तसेच कोतुळ ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सौ. अनुसया रावजी धराडे यांचे चिरंजीव होते. मिळालेल्या माहितीनुसार, पोपट धराडे हे सकाळी सुमारे ९.३० वाजता आपल्या झेंडूच्या शेतीकडे गेले होते. शेततळ्याच्या कडेला चालत असताना त्यांचा पाय घसरून ते पाण्यात पडले. त्यांना पोहता येत नसल्याने तसेच शेततळ्याच्या कडेला शेवाळ असल्याने त्यांना बाहेर पडता आले नाही. त्यांनी हातपाय मारण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्यात बुडाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुपारी १२ वाजेपर्यंत ते घरी जेवणासाठी न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. मोबाईल फोन बंद लागत असल्याने नातेवाईक व परिचितांकडे चौकशी



करण्यात आली. मात्र ठावठिकाणा न लागल्याने कुटुंबीय शेताकडे गेले. शेततळ्याजवळ एक चप्पल वर तर दुसरी चप्पल पाण्यात तरंगताना दिसल्याने संशय बळावला. यानंतर गावातील नागरिकांना बोलावण्यात आले. पोहता येणाऱ्या व्यक्तींनी शेततळ्यात उतरून शोध घेतला असता पोपट धराडे हे तळाशी चिखलात अडकलेल्या अवस्थेत आढळून आले. दोरीच्या साहाय्याने त्यांना बाहेर काढून तातडीने कोतुळ ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे भांगेवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत असून धराडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# तळपत्या उन्हात सर्व सामान्य माणसाच्या रांगाच रांगा

**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

युद्ध जन्य परिस्थिती मुळे गॅस चा तुटवडा झाला आहे मात्र आपल्या नांदेड जिल्ह्यात जेवढा तुटवडा आहे तेवढा तुटवडा आपल्या शेजारी जिल्ह्यात दिसत नाही कारण आपल्या नांदेड जिल्ह्यातील गॅस विक्रेते मोठ्या प्रमाणात अवैध रित्या १००० हजारचा गॅस सलेंडर जवळपास २००० हजार रुपया मध्ये विक्री करीत असल्याचे मत सर्व सामान्य नागरीकांतून बोलले जात आहे कारण गॅस च्या तुटवड्या मुळे वसरणी रोड वरील भारत गॅस गोडाऊन समोर " तळपत्या उन्हात सर्व सामान्य माणसाच्या रांगाच रांगा तर श्रीमंतांना घरपोच सेवा ही गॅस विक्रेत्यांची दुट्टपी भूमिका सर्व सामान्य नागरीकांचे हाल बेहाल होत असून जिल्हाधिकारी यांच्या सह लोकप्रतिनिधी यांनी लक्ष द्यावेत अशी जनतेतुन मागणी केली जात आहे . सध्या जवळपास ४३.४४ ?असा तापमाण आहे यात गॅस गोडाऊन समोर तळपत्या उन्हात सकाळी १० ते दुपारी २ ३ पर्यंत रांगा लावुन नागरीक ऊभे दिसत आहेत मात्र त्यांना उष्णते पासून बचावासाठी या सर्व् सामान्य जनते च्या जिवावर करडो रुपये





कमवणारी भारत गॅस कंपनी या ग्राहकांना उष्णते च्या बचावा साठी काही उपाय योजना करून त्यांच्या साठी आसरा सावली तरी करावी असा संतप्त सवाल सर्व सामान्य नागरीकांतून केला जात आहे कारण या रांगा लावणाऱ्या मध्ये एकही मोठा श्रीमंत शेठ दिसून येत नाही रोज रोजंदारीवर जाऊन हातावर पोट असणारेच गोर गरिब जनता दिसत आहे कारण हे लोक १ हजार च्या गॅस साठी २ हजार रुपये देऊ शकत नाही आशा काळ्या बाजारात गॅस विक्री करणाऱ्या लुटारू विक्रेते यांच्यावर अंकुश ठेऊन जिल्हाधिकारी साहेबांनी व प्रशासनाने योग्य ते कारवाई करून यांचा परवाना रद्द करण्यात यावी अशी संतप्त मागणी गोर गरीब जनतेतून केली जात आहे कारण मोठ मोठ्या अमिर लोकांना या तुटवड्या चा काहीच फरक पडत नाही कारण ते १ हजार चे २ हजार रुपये गॅस विक्रेते यांना देऊन तो ताबडतोब गॅस मिळुन जाते त्या साठी त्यांना उन्हा तान्हात फिरण्याची किंवा रांगा लावण्याची गरज नाही त्यासाठी या होणाऱ्या प्रकाशवर प्रशासनाने लक्ष देऊन सर्व सामान्य नागरीकांना गॅस वेळेवर मिळावे व पाच सहा तास उन्हात तांबन्याची वेळ येऊ नये कारण एवढ्या उन्हात पाच सहा तास तांबल्यावर एखाद्याला उन्ह लागून त्याच्या जिवास काही बरे वाईट झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार आहे त्यामुळे जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन विक्रेते यांच्या मार्फेत या पूर्वी प्रमाणे सर्वांच्या घरपोच सेवा मिळावी अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली आहे.

# शासकीय ओढा बुजवून अतिक्रमण केले बाबतचा तक्रार दखल नाही

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

नगर-पारगाव रोड,देवी मंदीराजवळ दत्तवाडी, लोखंडेवाडी येथील शासकीय ओढयात अतिक्रमण केलेबाबतचा तक्रार दाखल करुनही त्वरीत कार्यवाही होत नसले बाबत लवकरात लवकर कार्यवाही न झाल्यास उपोषणास बसणेबाबतचा इशारा आज शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी याना निवेदन शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके यांच्या नेतृत्वखाली देण्यात आले. यावेळी शेतकरी अनिल पांडुरंग लोखंडे,रमेश पोपट लोखंडे, संतोष लक्ष्मण लोखंडे,मनिषा लोखंडे, सोमनाथ बबन शिर्के,संभाजी अशोक कुसकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे आम्ही नगर-पारगाव रोड, देवी मंदीराजवळ दत्तवाडीरोड, लोखंडेवाडी,ता श्रीगोंदा येथे राहत असुन आमचे नावे वडीलोपार्जीत मालकीची शेतजमीन गट नं.४८४,४८५,४८६,४८७,४८९ मध्ये शेतजमीन आहे.सदर गटामध्ये आमचे श्रीगोंदा- दत्तवाडी रोडचे लगत आमचे घरे आहेत,घराचे पाठीमागे जमीनी आहेत.आमचे गटाचे पुर्व बाजुस शासकीय ओढा आहे. पावसाळयात सदर ओढयाला भरपुर पाणी येते.परंतु शासकीय ओढयाचे व रस्त्याचे पुर्व बाजुस निलेश मोटे व विलास उर्फ संजय मारुती मोटे,नाना उर्फ नारायण मारुती मोटे यांचे क्षेत्र आहे.त्याचे गटाशी व आमचे गटाशी कोणताही संबंध येत नाही.सदर ओढा हा अंदाजे ६००ते ७००फुट लांबीचा आहे व १०० फुट रुंदीचा ओढा आहे.परंतु अनेक वर्षापासुन विलास संजय मोटे,नारायण मोटे,हे आम्हा शेतकऱ्यांना विनाकारण मानसिक त्रास देत आहे व शासकीय ओढयावरती मालकी हक्क दाखवत आहे.आम्हाला आमचे क्षेत्रात जाणे येणेस ओढयातुन हरकत अडथळा करुन सिमेटी नळ्या ओढयामध्ये टाकुन ओढा व रस्ता बंद केलेला आहे. पावसाळयात पावसाचे पाणी आमचे शेतात घरामध्ये शिरेल.

दि.१३/०२/२०२६ रोजी शासकीय ओढयामध्ये हायवे व जेसीबीने मुरुम दगड,गोटे टाकुन शासकीय ओढा पुर्णपणे बंद केला.तसेच दि. २०/०३/०२६ रोजी विलास मोटे यांनी हायवाने मुरुम आणुन राहिलेला शासकीय ओढा बुजविलेला त्यामुळे आम्ही दि. २०/०३/२०२६ रोजी मा.तहसिलदार साहेब श्रीगोंदा यांना तक्रारी अर्ज दाखल केला. त्यानंतर दि.०६/०४/२०२६ रोजी मंडळाधिकारी व का.तलाठी यांनी येऊन स्थळ पहाणी करुन पंचनामा केला. मा.तहसिलदार साहेब श्रीगोंदा यांनी दि. २१/०४/२०२६ ची तारीख दिली आम्ही सदर तारखेला हजर राहिलो परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यानंतर आम्हाला आजपर्यत ४ तारखा दिल्या आम्ही तारखेला हजर राहुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. गेल्या दि.१९ मे रोजी तहसिलदार साहेब यांचकडे गेलो असता त्यांनी आम्हाला तोंडी सांगितले की स्थळ पाहणीसाठी लवकरात तारीख काढतो असे म्हणुन टाळाटाळ केली.

तरी मे.साहेबांना सांगण्यात येते की,पावसाळा सुरु होत असल्याने अचानक पाऊस आला तर ओढयातील सर्व पाणी आमचे घरात व शेतात जाऊन आमचे खुप मोठे कधीही भरुन न येण्याजोगे नुकसान होणार आहे तसेच आमचे जनावरे यांना ही धोका आहे तरी सदर अर्जाची लवकरात लवकर दखल घेऊन ८ दिवसाचे आतमध्ये आमचे अर्जाचा विचार करुन त्यावरती कार्यवाही होऊन सदरचे अतिक्रमण काढण्यात यावे अतिक्रमण काढले नाही तर आम्ही आपल्या कार्यालयाचे समोर कुटुंबासह उपोषणास बसणार आहोत. यांची नोंद घ्यावी ही विनंती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 | 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा



## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी
सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 | 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकॅनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 | 9922545516
9765431168 | 7028724045 | 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्यूपंक्चर कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व ॲक्युपंक्चरिस्ट
- ॲक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 | 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

## थोडक्यात पण महत्वाचे



### सोशल मीडियाच्या तालुकाध्यक्षपदी गुरुराज रणखांब यांची निवड

अर्धापूर (स.गांवकरी) : तालुक्यातील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते गुरूराज रणखांब यांची भाजप सोशल मीडियाच्या तालुकाध्यक्ष पदी निवड झाल्याचे नियुक्ती पत्र माजी मुख्यमंत्री, खा.अशोकराव चव्हाण, आ.श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते देऊन करण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण व आ.श्रीजयाताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख, भाजप तालुका प्रभारी माजी सभापती किशोर स्वामी, कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर,भाजप तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे यांनी भाजप सोशल मीडिया तालुकाध्यक्ष पदी गुरुराज रणखांब यांची निवड केली आहे. भाजप सोशल मीडिया तालुकाध्यक्ष पदी गुरुराज रणखांब यांची निवड झाल्याबद्दल नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, संचालक निळकंठराव मदने,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, आनंदराव भंडारे,गटनेते बाबुराव लंगडे,राज बारसे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष पवन इंगोले,ता.सरचिटणीस परमेश्वर बंडाळे,ता.उपाध्यक्ष कोंडीबा सुर्यवंशी,तुकाराम माटे,डॉ.विशाल लंगडे,व्यंकटी राऊत, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे,माजी नगरसेवक तुकाराम साखरे,सरपंच विजय भुस्से, विठ्ठल काकडे,हेमंत देशमुख,प्रंसनजित लोणे यांच्या सह अनेक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.



### लग्नाच्या उद्देशाने पळवून नेलेल्या युवतीचा काही तासांत शोध

डांग. गुजरात (स. गांवकरी) : पोलीस महानिरीक्षक प्रेमवीरसिंग (सुरत रेंज) तसेच पोलीस अधीक्षक पूजा यादव डांग यांच्या मार्गदर्शनाखाली हरवलेल्या व मिसिंग व्यक्तींचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलिसांकडून सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली जात आहे. या मोहिमेअंतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी (आहवा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली सापुतारा पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक के. बी. सांखला आणि त्यांच्या पथकाने दिनांक १८/०५/२०२६ रोजी पहाटे सापुतारा चेकपोस्ट येथे वाहन तपासणी मोहीम राबवली होती. दरम्यान महाराष्ट्रातून गुजरातकडे येणारी हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. MH-15-JE-3848) थांबवून तपासणी करण्यात आली. या मोटारसायकलवर एक युवक, आणखी एक इसम आणि एक युवती प्रवास करत होते. चौकशीदरम्यान संशय आल्याने तिघांनाही अधिक तपासासाठी सापुतारा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सखोल चौकशीत समोर आले की संबंधित युवकाने लग्नाच्या उद्देशाने युवतीला तिच्या पालकांच्या ताब्यातून पळवून आणले होते. याबाबत महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील वनी पोलिस स्टेशन यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर युवतीची तिच्या कुटुंबीयांसोबत भेट घडवून आणण्यात आली. तसेच युवक आणि युवतीचा ताबा नाशिक जिल्ह्यातील वणी पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल एस. एन. बच्चाव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या संपूर्ण कारवाईत पोलीस निरीक्षक के. बी. सांखला, पोलीस कॉन्स्टेबल नितीशभाई पदमाभाई, कमलेशभाई वेलाभाई तसेच महिला पोलीस कॉन्स्टेबल रेखाबेन सेमाभाई यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.



### दिव्यातील दुकानदारांनी कचरापेटी ठेवण्याचे निर्देश

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : मागील काही वर्षांत दिवा शहराचे झपाट्याने शहरीकरण झाले असून स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आपला दिवा शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी शहरातील प्रत्येक घटकांनी आपलं योगदान दिलं पाहिजे ह्यासाठी शिवसेना नगरसेवक अँड. आदेश भगत यांनी सहायक आयुक्त यांना लेखी निवेदन देऊन स्वच्छता राखण्यासाठी व्यापाऱ्यांना निर्देश देण्याची मागणी केली दिवावासियांना व पंचक्रोशीतील इतर गावांना दिवा शहर हे मुख्य बाजारपेठ ठरली आहे. खरेदीदार वाढल्याने इथे लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनी आपली दुकाने, हॉटेल, स्नॅक्स कॉर्नर, गोडाऊनस थाटली आहेत. दिवा शहरात स्वच्छतेचा प्रश्न फार गंभीर असून दिवा शहरातील बहुतेक लाहन-मोठया दुकानात कचरापेटी (डस्टबीन) ची व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी ग्राहकांतर्फे फेकायचा कचरा व व्यापाऱ्यांकडून दुकानातील कचरा हा रस्त्यावर फेकला जातो. त्यामुळे अस्वच्छतेमध्ये आणखी भर पडते. दिवा शहरात स्वच्छतेचा विषय गंभीर असला तरी प्रशासनाबरोबरच शहरातील सर्वच घटकांनी स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला पाहिजे. लहान मोठे दुकानदार, व्यापारी, हॉटेल यांनी आपल्या दुकानात छोटीशी कचरापेटी ठेवली पाहिजे. दुकानात कचरापेटी नसल्याने ग्राहक कचरा बाहेर रस्त्यावर फेकतात या गोष्टीला कुठेतरी आळा बसला पाहिजे आणि महत्वाचे म्हणजे ज्या दुकानाबाहेर, हॉटेल बाहेर कचराकुंडी आहे अशा वेळी नागरिकांनी देखील कचरा उपल्ब्ध कचरापेटीत टाकून रस्त्यावर फेकणे बंद केले पाहिजे. रस्ते वगळून आपल्या इमारतींच्या आवारात व दोन इमारतींच्या मागे कचरा टाकण्याची जणू स्पर्धा निर्माण झाली आहे. नागरिकांची साथ लाभली तर आपण नक्कीच स्वच्छ दिवा सुंदर दिवा निर्माण करू शकतो असे मत नगरसेवक अँड आदेश भगत यांनी व्यक्त केले.

# नांदेड विधान परिषद निवडणुकीत "किनवट पॅटर्न" चर्चेत

## युवा नेते करण येंड्रलवार यांच्या नावाची जोरदार चर्चा

किनवट : (स. गांवकरी)

नांदेड जिल्ह्यातील आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही गोटांकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. जिल्ह्यातील १६ नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींसह नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील नगरसेवकांचे मतदान या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. दरम्यान, महाविकास आघाडीकडून "किनवट पॅटर्न" राबवला जाण्याची शक्यता वर्तवली जात असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवा नेते करण येंड्रलवार यांच्या नावाची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. लोहा, कंधार, भोकर, मुदखेड, बिलोली, देगलूर, धर्माबाद, हदगाव, किनवट, कुंडलवाडी, मुखेड, उमरी, हिमायतनगर, अर्धापूर, नायगाव आणि माहूर येथील नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये एकूण सुमारे ३५४ नगरसेवक मतदार आहेत. उपलब्ध पक्षीय बलाबल पुढीलप्रमाणे आहे : भाजपा – ७७, काँग्रेस – ७५, राष्ट्रवादी काँग्रेस – ७१, शिवसेना (शिंदे गट) – १५, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) – १७, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) – १३, मराठवाडा जनहित – ३३, एमआयएम – ५, वंचित बहुजन आघाडी – १, अपक्ष – १३ या आकडेवारीत नगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांचाही समावेश करण्यात आला आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने पुढील कार्यक्रम जाहीर केला आहे : उमेदवारी अर्ज भरणे : २५ मे ते १ जून २०२६, अर्ज छाननी व माघार : २ ते ४ जून २०२६, मतदान : १८ जून २०२६ (सकाळी ८ ते दुपारी ४),निकाल : २२ जून २०२६ आचारसंहिता लागू झाल्यानंतर जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासनाने निवडणूक नियमांची अंमलबजावणी सुरू केली आहे. महायुतीकडून उमेदवारी कोणाला दिली जाणार याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. भाजपा माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांचे निकटवर्तीय माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या नावाची चर्चा असली तरी अन्य काही नावांवरही विचार सुरू असल्याचे समजते. त्यामुळे महायुतीची अधिकृत भूमिका



काय राहणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडी या निवडणुकीत आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. मुंबईतील 'मातोश्री'वर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांनी या संदर्भात सविस्तर चर्चा केल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, महाविकास आघाडीकडून "किनवट पॅटर्न" राबवण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उ.बा. ठा. पक्षाचे युवा नेते करण येंड्रलवार यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. करण येंड्रलवार यांची दावेदारी ठरत आहे प्रबळ, राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, किनवट पॅटर्नचे प्रमुख शिल्पकार मानले जाणारे करण येंड्रलवार यांनी गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात स्वतःचे प्रभावी राजकीय नेटवर्क निर्माण केले आहे. त्यांच्या मातोश्री या किनवट नगर परिषदेत तब्बल ३९९६ मतांच्या विक्रमी आघाडीने थेट नगराध्यक्षा म्हणून निवडून आल्या होत्या. त्यामुळे किनवटमधील त्यांचा प्रभाव आणि संघटन क्षमता पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उ.बा.ठा. या तिन्ही घटक पक्षांतील अनेक नेत्यांशी करण येंड्रलवार यांचे घनिष्ठ संबंध असल्याचे बोलले जात आहे. तसेच महायुतीतील काही प्रभावी नेत्यांशी देखील त्यांचे वैयक्तिक स्नेहसंबंध असल्याने त्यांची दावेदारी अधिक मजबूत मानली जात आहे. राजकीय जाणकारांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील गणिते, नाराज गटांची संभाव्य भूमिका आणि युवा नेतृत्वाला संधी देण्याची रणनीती या सर्व बाबी लक्षात घेता करण येंड्रलवार हे महाविकास आघाडीसमोर प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहेत. तथापि, उमेदवारीबाबत अंतिम निर्णय हा महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांकडूनच घेतला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत मुंबई आणि नांदेड येथे राजकीय बैठका, गुप्त चर्चा आणि शक्तीप्रदर्शन अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## मोलमजुराच्या लेकीच्या जिद्दीला यश

भिवंडी : (स. गांवकरी)

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर यश संपादन करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण पडघा येथील सायली सलीम शेख हिने घालून दिले आहे. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांची लेक असलेल्या सायलीची ठाणे ग्रामीण पोलीस आयुक्तालयात पोलिस कॉन्स्टेबलपदी निवड झाल्याने संपूर्ण पडघा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सायलीने हे यश जिजाऊ सामाजिक संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या मोफत पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमी आणि वाचनालयाच्या सहाय्याने मिळवले आहे. झडपोळी येथे सुरू असलेल्या जिजाऊ अकॅडमीमध्ये अभ्यास करून तिने पोलिस भरतीची तयारी केली. आर्थिक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थिती असूनही हार न मानता सातत्याने केलेल्या परिश्रमामुळे तिने हे यश संपादन केले. सायलीच्या निवडीची बातमी समजताच पडघा गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. गावातून ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी सायलीवर पुष्पवृष्टी करून तिचे अभिनंदन केले. तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरलेल्या या यशामुळे गावकऱ्यांनी अभिमान व्यक्त केला.

यानिमित्त आयोजित सत्कार समारंभाला जिजाऊ सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सायलीचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोनिका पानवे, विष्णू चंदे, भगवान सांबरे, अरविंद सर, डॉ. निखिल सर तसेच जिजाऊ परिवारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विशाल जाधवांचा शिवसेनेत प्रवेश; भगव्याची ताकद वाढली

किनवट : (स. गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवकांचे प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले विशाल जाधव यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. मुंबई येथील मलबार हिल परिसरातील 'नंदनवन' तसेच शासकीय निवासस्थान 'शिवनेरी' येथे झालेल्या भव्य पक्षप्रवेश सोहळ्यात हा प्रवेश पार पडला. यापुर्वी त्यांनी राज्याचे मंत्री संजय राठोड, कॅबिनेट दर्जा हेमंत पाटील यांच्यासह प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्या. किनवट तालुक्याचे माजी आमदार दिवंगत प्रदीप नाईक यांच्या तालमीत राजकारणाचे धडे घेत युवकांमध्ये स्वतंत्र ओळख निर्माण करणारे विशाल जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देत शिवसेनेचा भगवा हाती घेतल्याने तालुक्यातील



राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. विशेष म्हणजे युवकांची मजबूत फळी, ग्रामपातळीवरील प्रभावी संपर्क आणि विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून विशाल जाधव यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेची ताकद किनवट तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशाल जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत करत भावी राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पोहरादेवी गडाचे महंत पूज्य जितेंद्र महाराज यांनीही सदिच्छा भेट देत नव्याने शिवसेनेत दाखल झालेल्या पदाधिकाऱ्यांना आशीर्वाद दिले. या सोहळ्यास खासदार धैर्यशील माने, बालाजी पाटील खतगावकर, उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, सहसंपर्कप्रमुख संभाजी लांडगे, तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे, माहूर तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

विशाल जाधव यांच्यासमवेत मनसेचे जिल्हाध्यक्ष महेश घूमनेरवार, प्रसिध्द उद्योजक मनोज तिरमनवार, सागर रूणवाल, शेख हसन चिखलीकर, दयाभाऊ पाटील, इंदल पवार, दिलीप राठोड, भरत राठोड, गणेश पवार यांच्यासह विविध पक्षांचे अनेक पदाधिकारी, माजी सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील १०० हून अधिक कार्यकर्त्यांनी भगवा हाती घेतल्याने किनवट तालुक्यात शिवसेनेला मोठे राजकीय बळ मिळाल्याचे मानले जात आहे. राजकीय जाणकारांच्या मते, विशाल जाधव यांचा प्रवेश हा केवळ एका नेत्याचा पक्षप्रवेश नसून युवक शक्ती, ग्रामपातळीवरील संघटन क्षमता आणि स्थानिक नेतृत्वाचा मोठा प्रवाह शिवसेनेकडे वळल्याचे संकेत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश शिवसेनेसाठी महत्त्वाचा मानला जात असून, किनवट तालुक्यात भगव्या पक्षाची ताकद अधिक भक्कम झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## "जुगार अड्ड्यावर कारवाईचे श्रेय नेमके कुणाचे?"

किनवट : (स. गांवकरी)

गोकुंदा येथे एका पत्रकाराच्या घराजवळ सुरू असलेल्या कथित जुगार अड्ड्यावर झालेल्या पोलिस कारवाईनंतर आता पोलिस विभागामध्येच "श्रेयवाद" रंगला असल्याचे चित्र समोर येत आहे. नेमकी कारवाई कोणी केली, स्थानिक पोलिसांनी की नांदेड परिक्षेत्रातील पोलिस उपमहानिरीक्षक (आयजी) यांच्या विशेष पथकाने, यावरून तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, दिनांक १६ मे २०२६ रोजी किनवट पोलिस ठाण्यात गुरन क्रमांक १०४/२०२६ हा महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कलम १२ (अ) अंतर्गत नोंद करण्यात आला. त्यानंतर किनवट पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आल्याची माहिती किनवट पोलिसांच्या अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप प्रेस ग्रुपवरून प्रसारमाध्यमांना देण्यात आली होती. स्थानिक पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे वृत्त दुसऱ्या दिवशी अनेक



वृत्तपत्रांमध्ये ठळकपणे प्रसिद्ध झाले. मात्र, या घटनेला वेगळे वळण तेव्हा मिळाले, जेव्हा दिनांक १७ मे रोजी संबंधित वृत्तपत्रांच्या ई-मेलवर पोलिस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांच्या पथकाकडून पीडीएफ स्वरूपात स्वतंत्र प्रेसनोट पाठवण्यात आली. त्या प्रसिद्धीपत्रकात १ मे ते ३१ मे २०२६ दरम्यान नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले असून, त्याअंतर्गत आयजी पथकाने किनवट येथे जुगार अड्ड्यावर छापा टाकल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे आता स्थानिक पातळीवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जर कारवाई आयजी पथकाने केली असेल, तर स्थानिक पोलिसांनी स्वतःच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाल्याचा दावा का केला? आणि जर स्थानिक पोलिसांनीच कारवाई केली असेल, तर आयजी पथकाने स्वतंत्र श्रेय घेण्यामागचे कारण काय? यामुळे पोलिस विभागातच श्रेय लाटण्याची स्पर्धा सुरू असल्याची चर्चा रंगू लागली आहे. दरम्यान, नागरिकांकडून आणखी गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संबंधित ठिकाणी मागील पाच वर्षांपासून जुगार सुरू असल्याची चर्चा परिसरात उघडपणे होत असताना, किनवट पोलिसांनी यापूर्वी कोणतीही ठोस कारवाई का केली नाही? स्थानिक पोलिसांना या अवैध प्रकाराची माहिती नव्हती का? की माहिती असूनही दुर्लक्ष करण्यात आले? जर परिस्थिती इतकी गंभीर होती, तर नांदेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाला थेट किनवटमध्ये येऊन कारवाई करण्याची वेळ का आली? विशेष म्हणजे, या प्रकरणामुळे स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अवैध धंदे अनेक वर्षे सुरू राहतात, मात्र कारवाई फक्त वरिष्ठ पथकाच्या हस्तक्षेपानंतरच होते, असे चित्र निर्माण होत असल्याने सामान्य नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणात नेमके "पाणी कुठे मुरते" हा प्रश्न आता किनवट तालुक्यात चर्चेचा विषय बनला असून, पोलिस प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी होत आहे.

## शिक्षण आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रेरणादायी संदेश

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरिवली गाव शिक्षण, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या नव्या आदर्शामुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. बोरिवली पडघा येथील प्रसिद्ध "सोहराब गुजर हॉल" येथे एसएससी (दहावी) आणि एचएससी (बारावी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत बोरिवली, माजी सरपंच सोहराब गुजर आणि ॲड. झियाद सोहराब गुजर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात मुस्लिम व बिगर-मुस्लिम विद्यार्थ्यांचा एकत्रित सन्मान करून सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला. या भव्य सोहळ्याचे आकर्षक आणि प्रभावी सूत्रसंचालन टेनिस क्रिकेट स्पर्धांमधील लोकप्रिय समालोचक सिद्दीक भाभे यांनी केले. आपल्या खास शैलीत, शायरी आणि विनोदी अंदाजातून त्यांनी संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. कार्यक्रमाला राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार शांताराम मोरे, भिवंडी पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) भिवंडी ग्रामीणचे अध्यक्ष गणेश गुलवी तसेच अभियंता दुर्राज कामानकर (के. के.) उपस्थित होते. याशिवाय पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख आणि पोलीस अधिकारी रुपेश जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या यशाचे अभिनंदन केले. बोरिवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर अब्दुल पिंजारी आणि ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्या - कर्डिले

## विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने विभाग प्रमुखांसमवेत बैठक

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात दि १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्व विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आज सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील एकूण ८ मतदान केंद्रांवर दि १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, मतमोजणी दि २२ जून रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात दि १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

दुष्काळ, पाणीटंचाई, नैसर्गिक आपत्ती यासारखी परिस्थिती वगळता आचारसंहिता कालावधीत विविध योजनांच्या शासकीय व नवीन जाहिराती देता येणार नाहीत. तसेच नवीन मान्यता, शासकीय कामांचे उद्घाटने करता येणार नाहीत. ग्रामसभेसह कोणत्याही कार्यालयात शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती राजकीय बैठका घेण्यासही मनाई आहे. मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही काम या कालावधीत करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही योजना किंवा राजकीय व्यक्तींची छायाचित्रे ठेवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व संबंधितांना केले.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी यावेळी दिली. मुक्त व निर्भय वातावरणात निवडणूक पार पडावी, तसेच मतदारांवर कोणताही प्रभाव पडणार नाही यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी प्रास्ताविकात निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्यामुळे त्यांचे सदस्य मतदार राहणार नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

याबैठकीपुर्वी निवडणूकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसोबत बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदान प्रक्रिया, प्रचारासंदर्भातील नियम, परवानग्या तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# पाणी फॉउंडेशन : जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

पाणी फाउंडेशन अंतर्गत आयोजित “सत्यमेव जयते फार्मर्स कप स्पर्धा 2026” जिल्हास्तरीय कार्यशाळा व मार्गदर्शन सत्र जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडले.

नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या या उपक्रमाच्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी समाधान व्यक्त केले. सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने कार्य करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक गावामध्ये लोकसहभाग वाढवून हा उपक्रम जनआंदोलनाच्या स्वरूपात राबविण्याचे आवाहन केले. तसेच प्रशासन, कृषी विभाग, स्वयंसेवी संस्था व ग्रामस्तरावर नागरिकांनी एकत्रितपणे काम केल्यास नांदेड जिल्हा राज्यामध्ये आदर्श निर्माण करू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेस पाणी फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी नांदेड/देगलूर/किनवट, सर्व तालुका कृषी अधिकारी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM/ATM), फार्मर्स कप स्पर्धेसाठी नियुक्त कृषी मेंटर्स, कृषी विभागाचे उपक्रम अधिकारी, सर्व NRM समन्वयक, समूह सहाय्यक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रतिनिधी, तालुका अभियान व्यवस्थापक, अभियान कक्ष अधिकारी, HIMWP-MH AGVSS कंधार, WOTR लोहा तसेच RAES किनवट येथील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मार्गदर्शन सत्रामध्ये “सत्यमेव जयते फार्मर्स कप स्पर्धा 2026” ही केवळ स्पर्धा नसून गाव विकास, जलसंधारण, नैसर्गिक शेती आणि सामूहिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ असल्याचे अधोरेखित करण्यात आले. गाव पातळीवर शेतकऱ्यांना एकत्र आणून गट बांधणी कशी करावी. गावातील प्रत्येक घटकाचा सहभाग कसा वाढवावा. तसेच स्पर्धेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक नेतृत्व व समन्वयाचे महत्व काय आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. अविनाश पोळ यांनी आपल्या प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शनातून शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करून त्यांना सामूहिक उद्दिष्टासाठी एकत्र आणणे हीच खरी यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. त्यांनी नैसर्गिक शेती, गट शेती, पाणी व्यवस्थापन, मृदसंवर्धन आणि लोकसहभाग या घटकांचा परस्पर संबंध स्पष्ट करत अनेक यशस्वी उदाहरणांद्वारे उपस्थितांना प्रेरित केले. शाश्वत शेती व्यवस्थेकडे वाटचाल करताना उत्पादन खर्च कमी करून पर्यावरणपूरक शेती पद्धती स्वीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी शेतकरी केंद्रित नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि वेळोवेळी आढावा घेण्याचे महत्व स्पष्ट केले. उपस्थित अधिकाऱ्यांना गावागावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचे व स्पर्धेचा उद्देश प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन केले.

हे मार्गदर्शन सत्र अत्यंत परिणामकारक, प्रेरणादायी व दिशादर्शक ठरले. उपस्थित सर्व अधिकारी, समन्वयक व प्रतिनिधींना या माध्यमातून आगामी कामकाजासाठी स्पष्ट दिशा, नवीन ऊर्जा व सकारात्मक प्रेरणा मिळाली. नांदेड जिल्ह्यात “सत्यमेव जयते फार्मर्स कप स्पर्धा 2026” अधिक प्रभावीपणे राबवून गाव विकास, जलसंधारण व शाश्वत शेतीच्या दिशेने एक मजबूत पाऊल टाकले जात असल्याचे या बैठकीतून स्पष्टपणे दिसून आले. सदर जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण पाणी फॉउंडेशन टीमने उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम अत्यंत प्रभावी, शिस्तबद्ध व प्रेरणादायी पद्धतीने पार पाडला.



ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २९ मधील देसाई, खिडकाळी येथे पाण्याच्या टाकी परिसरातील नगरसेविका अर्चना निलेश पाटील व नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या मागणीनुसार पाण्याच्या टाकीच्या जागेला पूर्ण वॉल कंपाऊंड, कर्मचारी व वॉलमेंटसाठी रेस्ट रूम, बाथरूम तसेच लाईन व वॉल जोडणीसाठी चेंबर करण्यासाठी भूमिपूजन करण्यात आले. सदरचे काम तीन महिन्यांत पूर्ण झाल्यानंतर पाण्याच्या टाकीची सुरक्षा अधिक मजबूत होईल तसेच सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही. तसेच पावसाळापूर्व नालेसफाई कामांचा पाहणी दौरा करण्यात आला. ग्रीन पार्क, शिबली नगर, भोलेनाथ नगर, दोस्ती परिसर, शीळफाटा आणि कल्याण फाटा येथील नाल्यांची पाहणी करण्यात आली. प्रसंगी ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी संजय जाधव, सुरेश वाघीरे, वायदंडे तसेच स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिव्यांगांना दरमहा ६००० रुपये अनुदान द्या : प्रहार दिव्यांग संघटना

- अतिरिक्त आयुक्तांसमवेत सकारात्मक बैठक

नाशिक (स. गांवकरी) : प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या दालनात विविध दिव्यांग समस्यांवर पदाधिका-यांसमवेत बैठक संपन्न झाली, राखीव दिव्यांग निधीतून दिव्यांगांना दरमहा 6000 रुपये अनुदान देण्यात यावे अशी प्रमुख मागणी जिल्हाध्यक्ष ललित पवार यांनी केली. राखीव दिव्यांग निधी अखर्चित राहत असल्याने दिव्यांगांना दरमहा देण्यात येणारे अनुदान 3000 वरून 6000 करण्यात यावे, दिव्यांग भवनात सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, प्रलंबित दिव्यांगांची प्रकरणे तातडीने मार्गी लावावी आदी मागण्या बैठकीत करण्यात आल्या, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी दिव्यांगांच्या सर्व समस्या तातडीने मार्गी लावण्यात येतील असे आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले याप्रसंगी जिल्हाध्यक्ष ललित पवार कार्याध्यक्ष बबलू मिर्झा , दत्ता कांगणे ,मनपा उपायुक्त नितीन नेर, पंकज सूर्यवंशी सुभाष निकाळजे, शोएब सिद्दिकी, शाहनवाज शेख आदी पदाधिकारी हजर होते.



### शरद पवारांना शिवरायांची मूर्ती भेट; ‘आपला मावळा’च्या कार्याला ऊर्जा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात बुधवारी पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात ‘आपला मावळा महाराष्ट्र’ संघटनेच्या वतीने आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सन्मानपूर्वक भेट देण्यात आली. या प्रसंगी खासदार नीलेश लंके यांनी उपस्थित राहून संघटनेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्याचा आढावा मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचे लोककल्याणकारी राज्यकारभार, शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि संस्कृती यांचा वारसा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी ‘आपला मावळा महाराष्ट्र’ संघटना सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विशेषतः युवकांमध्ये शिवचरित्राविषयी आकर्षण निर्माण व्हावे, इतिहासाचे भान वाढावे आणि महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान जागृत व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. कार्यक्रमात शरद पवार यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपत इतिहास संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्थांची आज समाजाला आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केल्याचे उपस्थितांकडून सांगण्यात आले. यावेळी खासदार नीलेश लंके यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करणारे आहेत. ‘आपला मावळा’ संघटनेच्या माध्यमातून शिवरायांचा इतिहास घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू असून, ग्रामीण भागातील युवकांमध्ये इतिहासाबाबत जागर निर्माण करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने आणि जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत.

### श्री ढोकेश्वर विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

पारनेर (स. गांवकरी) : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अंतर्गत, कार्यरत श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने इयत्ता 5 वी व 8 वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. इयत्ता 5 वी शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण 62 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल 25 विद्यार्थी पात्र ठरले असून, विद्यालयाचा निकाल 40.32 टक्के लागला आहे. या परीक्षेत चि. यश संदिप माकरे याने (228) गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच द्वितीय क्र. कु.भक्ती सचिन खैरे (192), तृतीय क्र. चि. रोहित सुमित कटारिया (180), तर इयत्ता 8 वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा 2026 मध्ये एकूण 38 विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी 10 विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यालयाचा निकाल 26.31 टक्के लागला आहे. चि. साई दत्तात्रय चिकणे याने 218 गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच द्वितीय क्र. कु.अथश्री अजय ठुबे (216), तृतीय क्र. चि. आराध्य शंकर पावडे (190), गुण मिळवून यश संपादन केले.

# कानिफनाथ मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न

शिवनेरी : (स. गांवकरी)

कानिफनाथ मंदिर दिल्ली पेठ जुन्नर येथे श्री गणेश तुळजाभवानी व कानिफनाथ मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भव्य कार्यक्रम पारंपारिक पद्धतीनुसार समस्त ग्रामंस्थ कुमशेत , दिल्ली पेठ, जुन्नर , भगत परिवार व मान्यवर या सर्वांच्या उपस्थिती कार्यक्रम संपन्न झाला . महंत पिर योगी अजयनाथ यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न झाला. श्री गणेश, तुळजाभवानी व कानिफनाथ मूर्तीची स्थापना महंत पिरयोगी अजयनाथजी व सद्गुरु पोपटनाथ महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आली. पहिला दिवसी कुमशेत दत्त मंदिर पासुन कानिफनाथ मंदिर जुन्नर या ठिकाणापर्यंत मांडव डहाळे पारंपारिक वाद्य वाजत गाजत मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बहुसंख्य महिलांनी तुळस , कळशी डोक्यावर घेऊन पारंपारिक गाणी म्हणत फुगड्या खेळत कार्यक्रमाचा आनंद घेतला. दुसऱ्या दिवशी गणपती पूजन, पुण्यहवाचन , जलाधिवास व प्रधान देवता अभिषेक, नवग्रह - रुद्र स्थापन , हवन , नैवेद्य व महाआरती करण्यात आली . तिसऱ्या दिवशी शांती सूक्त पठन , प्रांत पूजन, अभिषेक, शांतीक पौष्टिक हवन , तत्व न्यास हवन , न्यास, धान्याधिवस , पूजन नैवेद्य व महाआरती घेण्यात आली. चौथ्या दिवशी प्रांत पूजा , अभिषेक , बलिदान, मुख्य देवता प्राणप्रतिष्ठा , कलश स्थापना , ध्वजारोहण , पुणाहुती , नैवेद्य , महाआरती व भव्य महाप्रसाद आयोजन करण्यात आले.

या धार्मिक कार्यक्रमात समस्त ग्रामंस्थ कुमशेत , दिल्ली पेठ, जुन्नर , भगत परिवार , मान्यवर , शासकीय अधिकारी व परिसरातील भाविकांनी बहुसंख्येने उपस्थिती दाखविली.

# दहशत माजवणाऱ्या ‘चामठा गँग’च्या मुख्य सूत्रधाराला अटक

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)



डांग जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने मोठे यश संपादन करत आंतरराज्य ‘चामठा गँग’चा मुख्य सूत्रधार आणि गेल्या अनेक वर्षांपासून फरार असलेल्या कुख्यात वाँटेड आरोपीला अटक केली आहे. अनडिटेक्ट गुन्ह्यांचा छडा लावणे आणि “नो वॉन्टेड इन साऊथ गुजरात” मोहिमेअंतर्गत फरार आरोपींना पकडण्यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार डांग-आहवा जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जे. जी. अनडकट आणि त्यांचे पथक तपास करत होते. दरम्यान, एलसीबी पथकाला खात्रीशीर माहिती मिळाली की,सापुतारा पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीच्या तीन गुन्ह्यांतील फरार आरोपी गुजरातमध्ये आला आहे. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या चार स्वतंत्र टीम तयार करण्यात आल्या आणि तांत्रिक तसेच मानवी स्रोतांच्या मदतीने सखोल तपास करून अखेर आरोपीला वापी रेलवे स्टेशन येथून ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपीची प्राथमिक चौकशी आणि पडताळणी केली असता त्याचे नाव संदीप उर्फ अर्थवेद नटवर उर्फ अगस्त्य राठोड (नाणावट) (रा. रंजनगाव, बालाजी प्लॉट, फंड बस्ती, ता. शिरूर, जि. पुणे, महाराष्ट्र) असे असल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपीकडून सुमारे ₹२०,५०० किमतीचे दोन मोबाईल फोन आणि ₹६,३०० रोख रक्कम असा एकूण ₹२६,८०० चा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस चौकशीत आरोपीने धक्कादायक खुलासे केले आहेत. तो आंतरराज्य ‘चामठा गँग’चा मुख्य सूत्रधार असून अटकेपासून बचाव करण्यासाठी स्वतःचे आणि वडिलांचे वेगवेगळे नाव वापरत होता. ही टोळी गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यांत सक्रिय असून आतापर्यंत २७ गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग उघड झाला आहे.मुख्य आरोपी संदीपने गेल्या सात वर्षांत गुजरातमधील सापुतारा येथे ३ घरफोडी,गोधरा येथे दारूबंदी कायद्याचा १ गुन्हा, महाराष्ट्रातील कोल्हापुरयेथे ३ घरफोडी, कर्नाटकमध्ये सुमारे १३ घरफोडी आणि आंध्रप्रदेशमध्ये सुमारे ६ घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

याप्रकरणी दुसरा आरोपी सोरदेव सिलोन नाणावट (रा. पुणे, महाराष्ट्र) याचाही तपास करण्यात आला असून तो सध्या कर्नाटकातील नंदगडा पोलीस ठाण्यातील चोरीच्या गुन्ह्यात बेलगांव जैल येथे तुरुंगात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सापुतारा पोलिस चे एक पथक त्याचा ताबा घेण्यासाठी रवाना झाले आहे. सध्या अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपी संदीपला पुढील तपासासाठी सापुतारा पोलिस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले असून कर्नाटक आणि आंध्रप्रदेश पोलिसांनाही याबाबत माहिती देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे आगामी काळात आणखी अनेक गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अवतार कुळ परिवार मेळावा २०२६ उत्साहात संपन्न

पालघर : (स. गांवकरी)



पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील कोगदे-चंद्रगाव येथे अवतार कुळ परिवार मेळावा २०२६ उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र, गुजरात तसेच दादरा आणि नगर हवेली येथील अवतार कुळ परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परिवारातील ऐक्य, सामाजिक-सांस्कृतिक जपणूक आणि शैक्षणिक प्रगती हा मेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. मेळाव्याची सुरुवात कुलदेवतेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर कुलदेवतेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक आदिवासी वेशभूषा परिधान करून महिलांनी डोक्यावर गौरी घेत सांबळ नृत्य आणि तारपा नृत्य सादर केले. या मिरवणुकीत महाराष्ट्र, गुजरात आणि दादरा-नगर हवेली येथील अवतार कुळ परिवारातील सदस्य मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कोगदे परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच, ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये शांताराम घेगड, गणपत भोये, विजय भुसारा, नारायण घेगड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुरेश भोये, सेवा निवृत्त शासकीय अधिकारी श्री. घुटे साहेब तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. परिवारातील सुमारे २८ ते ३० गावांतील सदस्यांसह (पाचशे) ते सातशे (७००) नागरिकांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

मेळाव्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दहावी-बारावी, नीट परीक्षा, नवोदय व एकलव्य शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी, सरळ सेवा भरतीत निवड झालेले उमेदवार, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांचा गौरव करण्यात आला.

परिवारातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत पुढील वाटचालीसाठी विचारमंथन करण्यात आले. आदिवासी संस्कृती आणि परंपरा जपण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक सांबळ व तारपा नृत्य यामुळे कार्यक्रमाला पारंपरिक रंग चढला. मेळाव्याचे अध्यक्षपद सखाराम सोमा अवतार (कापराडा , गुजरात) यांनी भूषविले. सचिवपदी गोविंद रामा अवतार (कोगदे), खजिनदार म्हणून यदुनाथ भिवा अवतार (देवगाव), सहसचिव संतोष बाळू अवतार (आळ्यांचीमेट) तर उपाध्यक्षपदी राजाराम गोपाळ अवतार, प्रकाश अवतार आणि राघो रामा अवतार यांनी जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यदुनाथ अवतार यांनी केले. सूत्रसंचालन संतोष अवतार यांनी केले असून आभार प्रदर्शन व निरोप समारंभ कैलास अवतार यांनी पार पाडला. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# इगतपुरी तालुकाध्यक्षपदी नागेश गायकर यांची निवड

इगतपुरी : (स. गांवकरी)

महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या इगतपुरी तालुका अध्यक्षपदी नागेश गायकर यांची निवड करण्यात आली आहे. नागेश गायकर यांना हे नियुक्तीपत्र महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष रामदास जाधव यांनी दिले. आगामी येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर घोटी ते त्र्यंबकेश्वर या रस्त्याचे मोठ्या प्रमाणात रुंदीकरण करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शासनाकडून शेत जमीनी मोजण्यात येत होती. या वाढीव रस्त्यासाठी जमीनी संपादीत झाल्यास शेतकरी भुमीहीन झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून जमीनी देण्यास या मार्गावरील स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे हरकत घेण्यासाठी राज्य महामार्ग शेतकरी कृती समितीची स्थापना करण्यात आली होती. या कृती समितीच्या अध्यक्षपदी मनसेचे नागेश गायकर यांनी शेतकऱ्यांना एकत्र करून शासनाकडून मोठी नुकसान भरपाई मिळवून दिली होती. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाने नागेश गायकर यांना मनसेच्या शेतकरी तालुका प्रमुख पदी निवड झाली. अध्यक्ष पदी निवड होताच नागेश गायकर यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी व पक्ष वाढीसाठी काम करणार असल्याचे सांगितले. नागेश गायकर यांची निवड झाल्याबद्दल मनसेचे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ जाधव, प्रदेशचे रतनकुमार इचम,जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर भोर, शेतकरी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर भोर, जिल्हा उपसंघटक भागीरथ मराडे, मनसे विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष आत्माराम मते यांच्यासह इगतपुरी तालुका मनसे पदाधिकारी यांनी निवडीचे स्वागत केले आहे.

# काताळवेढ्यातून ४२.५०० किलो गांजा जप्त

- पारनेर पोलिसांचा अंमली पदार्थांविरोधात मोठा प्रहार
- ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, मुख्य आरोपी फरार

पारनेर : (स. गांवकरी)



लुक्यातील चारणवाडी-काताळवेढा परिसरात पारनेर पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात धडक कारवाई करत तब्बल ४२.५०० किलो गांजा जप्त केला. या कारवाईत गांजासह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मारुती आल्टो ८०० कार असा एकूण ११ लाख १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल बाळासाहेब गुंड हा कारवाईपूर्वीच फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांना १७ मे रोजी एका गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती प्राप्त झाली. चारणवाडी येथील राहुल गुंड याच्या घराच्या पाठीमागील बाजूस उभी असलेल्या आल्टो ८०० कारमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा साठवून ठेवण्यात आल्याचे समजताच पोलिसांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. या माहितीनंतर पारनेर पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. पोलिसांनी कोणतीही माहिती बाहेर न जाऊ देता नियोजनबद्ध पद्धतीने चारणवाडी-काताळवेढा परिसरात छापा टाकला.

छाप्यामध्ये संशयित आल्टो कारची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गांजा आढळून आला. पोलिसांनी कारमधून ४२.५०० किलो गांजा जप्त केला. प्राथमिक तपासात हा गांजा विक्रीसाठी आणण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत लाखोंमध्ये असल्याने या प्रकरणामागे मोठे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी गांजासह कार असा एकूण ११ लाख १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाईदरम्यान मुख्य आरोपी राहुल बाळासाहेब गुंड (रा. चारणवाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) हा घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत कलम ८(क), २०(ब)(आय)(सी) नुसार गुन्हा दाखल केला आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी पथके रवाना केली असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींची चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच या गांजाचा पुरवठा नेमका कुठून झाला आणि तो कोणाकडे विक्रीसाठी नेण्यात येणार होता, याचाही तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पारनेर पोलीस ठाण्याचे अमोल धामणे, कल्याण लगड, गणेश डोंगरे, सारंग वाघ, अभिजित बोरुडे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, संतोष खैरे, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ आणि दक्षिण विभाग मोबाईल सेलचे राहुल गुंड, नितीन शिंदे यांनी सहभाग घेतला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## पुनखेडा रस्त्याच्या गटारी नविन कराव्या; ग्रामस्थांची मागणी

रावेर (स. गांवकरी) : रावेर–पुनखेडा–पात तोंडी मुख्य रस्त्याचे काम सध्या वेगाने सुरू असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मात्र, पुनखेडा गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या जुन्या गटारी अद्याप नवीन करण्यात आलेल्या नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. पुनखेडा गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या दोन्ही बाजूंच्या गटारी अत्यंत निकृष्ट अवस्थेत असून त्या रस्त्यापासून सुमारे तीन फूट खाली गेल्या आहेत. गटारींमध्ये घाण पाणी साचल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून डासांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून अनेक लोक आजारी पडत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गटारींचे योग्य नियोजन व नवीन बांधकाम न करता रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आल्यास भविष्यात पावसाचे व सांडपाण्याचे पाणी रस्त्यावर साचून नव्याने तयार होणारा रस्ता खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाचा निधी वाया जाण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने प्रथम पुनखेडा गावातील मुख्य रस्त्यालगतच्या गटारींचे नवीन बांधकाम करून सांडपाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था करावी आणि त्यानंतरच रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## ल.ना. होशिंग विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



जामखेड तालुका (स. गांवकरी) : दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे ल.ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील १७ विद्यार्थी पात्र ठरले. अभिषेक अर्जुन आजबे याने २०६ गुण मिळवत ६८.६६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. तेजल हौसराव पवार, संस्कृती दिगांबर कुलकर्णी, सार्थक सुरेश वाव्हळ, स्वरांजली प्रविण वाळुंजकर आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळविले. तर इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ५ विद्यार्थी पात्र ठरले. आयुष अजिनाथ बनसोडे याने १७८ गुण मिळवत ५९.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. श्रवण किरण जाधव, सायली सुरेश वाव्हळ, तन्वी विजय गवळी व प्रणव अशोक वारे यांनीही यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष उद्धवराव देशमुख, उपाध्यक्ष दिलीप गुगळे, सचिव अरुण चिंतामणी, सहसचिव डॉ. सुनील कटारिया, खजिनदार शरद देशमुख, संचालक शिवाजी कासार, दत्तात्रय वडे, दिपक होशिंग आदींसह माजी सचिव शशिकांत देशमुख, माजी खजिनदार राजेश मोरे, प्राचार्य बाळासाहेब पारखे, उपप्राचार्य प्रा. युवराज भोसले, उपमुख्याध्यापक दत्तात्रय राजमाने, पर्यवेक्षक अनिल देडे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व पालकांचेही कौतुक करण्यात आले. या परीक्षेसाठी बाह्य परीक्षा विभागप्रमुख हनुमंत वराट यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. इयत्ता पाचवीसाठी सुप्रिया घायतडक, पूजा भालेराव, प्रियंका सुपेकर, स्वाती बांगर तर इयत्ता आठवीसाठी लक्ष्मण सोळंके, स्वप्नाली घाडगे, विनोद लंगे, अनिल देडे आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## अतिवृष्टीग्रस्त ५२७ शेतकऱ्यांना आर्थिक मदत; ७८ लाखांचे अनुदान



जामखेड तालुका (स. गांवकरी) : २०२५-२६ खरिप हंगामातील अतिवृष्टी व पुरस्थितीमुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहीरीच्या दुरुस्ती कामासाठी नुकसान झालेल्या जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अनुदान निधी मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश आले आहे. प्राप्त आदेशानुसार जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना दोन टप्प्यांत निधी वितरित करण्यात येणार असून, पहिल्या आदेशात ही१२८ शेतकऱ्यांसाठी सुमारे १८ लाख ६८ हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.तर दुसऱ्या आदेशात ३९८ लाभार्थी शेतकऱ्यांसाठी सुमारे ५९ लाख ७४ हजार अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही आदेशांमधून जामखेड तालुक्यातील एकूण ५२७ शेतकऱ्यांना सुमारे ७८ लाख ४२ हजार रुपये आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे.प्रा. राम शिंदे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.असे मत बाजार समितीचे सभापती पै.शरद कार्ले यांनी व्यक्त केले आहे.

## मेडिसिन डीलर्स असोसिएशनचा मूक मोर्चा

रावेर (स. गांवकरी) : आज दिनांक २० रोज बुधवार सकाळी साडेदहा वाजता नवजीवन नगरपालिका हॉस्पिटल येथून रावेर तालुका मेडिकल डीलर्स असोसिएशनचा मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले मूक मोर्चा शांततेच्या मार्गांनी स्टेशन रोड वरून माननीय तहसीलदार मॅडम यांना निवेदन देण्यासाठी गेले मूक मोर्चा ला मार्गदर्शन करताना लक्ष्मण सावळे यांनी सांगितले कि जीआर 817 याचे कायद्यात रूपांतर करावी व दिल्ली हायकोर्टातील स्थगिती असलेली ऑनलाइन औषधी विक्री बंद करावी व कोरोना काळातील जीएसआर 220 ही चा अंमलबजावणी बंद करावी व कार्पोरेट कंपनीकडून डिस्काउंटच्या माध्यमातून छोटा रिटेल केमिस्ट रिटेल संपवण्याचा डाव आखला जात आहे, मात्र देशातील लाखो केमिस्ट हा अन्याय सहन करणार नाही देशातील प्रत्येक केमिस्ट हा रुग्ण सेवेसी जोडलेला आहे त्यामुळे ही लढाई केवळ केमिस्ट हिताची नाही तर देशातील प्रत्येक रुग्णाच्या सुरक्षित भविष्यासाठीची आहे, विशेष म्हणजे ड्रग अँड कॉस्मेटिक कायदा 1940 आणि 1945 मध्ये ऑनलाईन औषधी विक्री बाबत कोणतेही स्पष्ट कायदेशीर तरतूद अस्तित्वात नाही त्यामुळे ऑनलाईन औषधी विक्री बंद करावी ही मागणी केली.

# सिंधुताई सपकाळ स्वाभिमान योजना : स्वावलंबनाची नवी दिशा

ठाणे : (स. गांवकरी)



पंचायत समिती कल्याण कृषी विभाग व उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या कृती संगमातून सिंधुताई सपकाळ स्वाभिमान योजना २०२५-२६ अंतर्गत ६० टक्के अनुदानित योजनेद्वारे कल्याण तालुक्यातील महिला शेतकऱ्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेअंतर्गत घोटसई प्रभागातील सांगोडे गावच्या "स्वराज्य स्वयं सहायता समूह" आणि वासुंद्री गावच्या "प्रगती स्वयं सहायता समूह" या महिला बचत गटांनी ई-कार्टचा लाभ घेत स्वतःचा भाजीपाला थेट बाजारपेठेत विक्री करण्यास सुरुवात केली आहे.

ग्रामीण भागातील अनेक महिला शेतकरी भाजीपाला उत्पादन करत असल्या तरी बाजारपेठेचे ज्ञान, वाहतुकीची सुविधा आणि विक्री व्यवस्थेअभावी त्यांना आपला माल कमी दरात व्यापाऱ्यांना विकावा लागत होता. मोठ्या कष्टाने पिकविलेल्या भाजीपाल्याला योग्य मोबदला मिळत नसल्याने महिलांच्या उत्पन्नावर मर्यादा येत होत्या. ही परिस्थिती बदलण्यासाठी महिला बचत गटांनी एकत्र येत गावातील महिलांचा भाजीपाला संकलित करून तो थेट मोठ्या बाजारपेठेत विक्री करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पंचायत समिती कल्याण कृषी विभागामार्फत सिंधुताई सपकाळ स्वाभिमान योजना अंतर्गत ई-कार्ट उपलब्ध करून देण्यात आले. या योजनेत ६० टक्के अनुदान मिळाल्यामुळे महिलांनी स्वनिधीतून उर्वरित रक्कम उभी करून हा उपक्रम सुरू केला आहे.

या माध्यमातून सांगोडे व वासुंद्री गावातील महिला आता कल्याण, टिटवाळा तसेच विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये थेट भाजीपाला विक्री करत आहेत. त्यामुळे मध्यस्थांवर अवलंबून राहण्याची गरज कमी झाली असून शेतमालाला पूर्वीपेक्षा अधिक चांगला दर मिळू लागला आहे.

भाजीपाला विक्रीबरोबरच या ई-कार्टचा उपयोग गावातील मच्छी विक्री, पाणी जार वाहतूक तसेच इतर वस्तूंच्या ने-आणीसाठीही करण्यात येणार आहे. त्यामुळे गावातील महिलांना कमी खर्चात वाहतूक सुविधा उपलब्ध होऊन अतिरिक्त रोजगारनिर्मितीलाही चालना मिळणार आहे. स्वराज्य स्वयं सहायता समूहाच्या सदस्य कामिनी शनिश्वर सुतार यांनी सांगितले की, "उमेद अभियानामुळे आम्हाला उपजीविका वाढीचे महत्त्व समजले. आधुनिक आणि सेंद्रिय शेतीकडे वळल्यानंतर उत्पादन वाढले, मात्र बाजारपेठेअभावी योग्य दर मिळत नव्हता. आता ई-कार्टमुळे आम्ही स्वतःच भाजीपाला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहोत. त्यामुळे आम्हाला चांगला भाव मिळत असून गावातील इतर महिलांनाही फायदा होत आहे."

त्या पुढे म्हणाल्या की, "पूर्वी व्यापाऱ्यांना कमी दरात भाजी विकावी लागत होती. आता आम्ही गावातील महिलांकडूनच भाजीपाला योग्य दराने खरेदी करून मोठ्या बाजारात विक्री करत आहोत. यातून गटातील महिलांचे उत्पन्न वाढत असून आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळत आहे." जिल्हा परिषद ठाणे व पंचायत समिती कल्याण यांच्या माध्यमातून महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी विविध योजनांचा प्रभावीपणे लाभ देण्यात येत असून ग्रामीण महिलांना रोजगार, बाजारपेठ आणि आर्थिक सक्षमीकरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे कृषी विभागामार्फत सांगण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिला शेतकरी संघटित होत असून "उत्पादन ते बाजारपेठ" हा संपूर्ण प्रवास स्वतः हाताळण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण होत आहे. सिंधुताई सपकाळ स्वाभिमान योजनेच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक विकासाबरोबरच ग्रामीण भागातील स्वयंरोजगाराला नवी गती मिळत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

आणि पुढे जाऊन अशाच प्रकारे उमेद - महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मार्फत महिलांच्या उपजीविका वाढीवर भर देऊन नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रॉडक्ट्स तयार करणार आहेत. जसे आता भाजीपाला कलेक्शन, ग्रेडिंग, पॅकिंजिंग, बाजारपेठ शोधणे, मार्केटिंग करून स्वतः मार्केट मध्ये स्थान निर्माण करत आहेत.

## महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

ठाणे: (स. गांवकरी)

अनुसूचित जाती / नवबौद्ध तसेच अनुसूचित जमाती / आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी कृषी विभागामार्फत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना" आणि "बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना" प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून सिंचन सुविधा, कृषी यांत्रिकीकरण तसेच जलसंधारणासाठी विविध घटकांवर अनुदान देण्यात येत असून पात्र शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी केले आहे. या योजनेंतर्गत नवीन सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, पंपसंच, सोलार पंप, एचडीपीई / पीव्हीसी पाईप, ठिबक व तुषार सिंचन संच, बैलचलित व ट्रॅक्टरचलित कृषी अवजारे तसेच परसबाग आदी घटकांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना" आणि "बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना" अंतर्गत नवीन सिंचन विहिरीसाठी कमाल ४ लाख रुपये, जुनी विहीर दुरुस्तीसाठी १ लाख रुपये, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण २ लाख रुपये, इनवेल बोअरिंगसाठी ४० हजार रुपये, पंपसंचसाठी ४० हजार रुपये, सोलार पंपासाठी ५० हजार रुपये, यंत्रसामुग्री ५० हजार रुपये, परसबाग ५ हजार रुपये, एचडीपीई/ पीव्हीसी पाईप ५० हजार रुपये तसेच ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार रुपये आणि तुषार सिंचन संचासाठी ४७ हजार, विज जोडणी आकार २० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत विंधन विहिरीसाठीही ५० हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध आहे.

## ज्युपिटर हॉस्पिटल : यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

पुणे : (स. गांवकरी)



ज्युपिटर हॉस्पिटल पुणे येथे अवघ्या ३.८ किलो वजनाच्या आणि ८ महिन्यांच्या बालकावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. अत्यंत कमी वजनाच्या बालकावर करण्यात आलेल्या या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमुळे त्या बालकाला नवजीवन मिळाले आहे. या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे बाळाच्या आईने स्वतः पुढे येत जिवंत दाता म्हणून आपल्या यकृताचा काही भाग दान केला. योग्य वेळी घेतलेल्या या निर्णयामुळे बाळाचे प्राण वाचविणे शक्य झाले. हे बालक जन्मतःच प्रगत अवस्थेतील यकृत विकाराने त्रस्त होते. पारंपरिक उपचार निष्फळ ठरत असल्याने तातडीने यकृत प्रत्यारोपण करणे आवश्यक झाले होते. मात्र, एवढ्या कमी वजनाच्या बालकावर शस्त्रक्रिया करणे डॉक्टरांसमोर मोठे आव्हान होते. बाळाचे अवयव, रक्तवाहिन्या आणि श्वसनमार्ग अत्यंत नाजूक असल्याने प्रत्येक टप्प्यावर अत्यंत अचूक नियोजन करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान आईकडून घेतलेल्या यकृताच्या भागाचे बाळाच्या शरीररचनेनुसार अचूक जुळवून प्रत्यारोपण करण्यात आले. द्रव संतुलन, रक्तस्त्राव नियंत्रण, तापमान नियंत्रण आणि शस्त्रक्रियेनंतरची स्थिती स्थिर राखण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने काटेकोर नियोजन केले.

मुख्य प्रत्यारोपण शल्यविशारद डॉ. बिपीन विभुते यांनी सांगितले की, "या प्रक्रियेसाठी प्रत्यारोपण शल्यविशारद, बाल यकृत तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि अतिदक्षता विभागातील डॉक्टरांमध्ये अत्यंत समन्वय आवश्यक होता." मुख्य भूलतज्ज्ञ डॉ. मनीष पाठक म्हणाले, "अशा लहान बालकाला भूल देणे हे अत्यंत कठीण कामांपैकी एक आहे. रक्तदाब, तापमान किंवा द्रव संतुलनातील अगदी छोटासा बदलही गंभीर परिणाम करू शकतो." बाल यकृत तज्ज्ञ डॉ. स्नेहवर्धन पांडे यांनी सांगितले की, "अशा शस्त्रक्रियेमध्ये बालकाच्या वजनातील प्रत्येक ग्रॅम महत्त्वाचा असतो. उपचाराच्या प्रत्येक टप्प्यावर अत्यंत अचूकता आवश्यक असते." बाल अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. शिवहर सोनावणे यांनी या यशामागे डॉक्टरांच्या समन्वयित प्रयत्नांसोबतच आईचे धैर्य आणि समर्पणही महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. शस्त्रक्रियेनंतर बालकाची प्रकृती स्थिर असून यकृताचे कार्य सुरळीत सुरू असल्याचे सकारात्मक संकेत मिळत आहेत. डॉक्टरांच्या देखरेखीखाली बालकाची प्रकृती सुधारत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. ज्युपिटर हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र पाटणकर यांनी सांगितले की, "अशा प्रकारच्या बाल यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अत्यंत नाजूक असतात.

वेळेवर निदान, प्रगत वैद्यकीय कौशल्य आणि आईचा निःस्वार्थ त्याग यामुळे हे यश शक्य झाले." ही यशस्वी शस्त्रक्रिया पुण्यातील प्रगत बालरोग उपचार सेवांच्या वाढत्या क्षमतेचे प्रतीक मानली जात असून, योग्य वेळी उपचार आणि तज्ज्ञांच्या समन्वयामुळे गंभीर वैद्यकीय आव्हानांवर मात करणे शक्य असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## कळवण उपजिल्हा रुग्णालयाला वातानुकूलित शवपेटीची भेट

कळवण : (स. गांवकरी)

- दुःखाच्या क्षणी नागरिकांना दिलासा.
- मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त नगराध्यक्ष कौतिक पगार यांचा विधायक उपक्रम
- मृतांच्या नातेवाईकांची होणारी गैरसोय आता होणार दूर



कळवण जन्म आणि मृत्यू हे जीवनाचे अटळ सत्य... पण एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतर, मृत व्यक्तीच्या पार्थिवाच्या व्यवस्थेसाठी होणारी धावपळ आणि गैरसोय ही जखमेवर मीठ चोळणारी ठरते. विशेषतः ग्रामीण भागात शव ठेवण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने अनेक कुटुंबांना मोठ्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत होते. मात्र आता कळवणकरांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त कळवण नगराध्यक्ष कौतिक पगार यांच्या पुढाकारातून कळवण उपजिल्हा रुग्णालयाला वातानुकूलित शवपेटी (फ्रीजर बॉक्स) भेट देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर नातेवाईक दूरवरून येईपर्यंत पार्थिव सुरक्षित ठेवणे शक्य होणार असून, दुःखाच्या क्षणी कुटुंबीयांची होणारी गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

आजवर कळवण शहर आणि परिसरातील अनेक कुटुंबांना पार्थिव जास्त वेळ सुरक्षित ठेवण्यासाठी खाजगी सुविधा शोधाव्या लागत होत्या. काही वेळा आर्थिक अडचणींमुळे तर काही वेळा सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. नातेवाईक परगावी असतील, मुलं-मुली कामानिमित्त बाहेर असतील, तर अंत्यविधी लांबणीवर जात असे आणि त्या काळात पार्थिवाच्या व्यवस्थेचा प्रश्न गंभीर ठरत असे. हीच गरज ओळखून करण्यात आलेला हा उपक्रम नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त मानला जात आहे.

"वाढदिवस केवळ शुभेच्छांचा किंवा बॅनरबाजीचा नसावा, तर समाजासाठी उपयोगी काम करण्याची संधी असावी," असा संदेश या उपक्रमातून दिला जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. सामाजिक बांधिलकी जपत रुग्णालयाला दिलेली वातानुकूलित शवपेटी ही केवळ एक वस्तू नसून, दुःखाच्या क्षणी आधार देणारी संवेदनशील मदत ठरणार आहे.

यावेळी विविध मान्यवर, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुग्णालय प्रशासनानेही या उपक्रमाचे स्वागत करत, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे मत व्यक्त केले. कळवणसारख्या ग्रामीण भागात आरोग्य सुविधांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असताना, समाजहिताच्या दृष्टीने उचललेले असे विधायक पाऊल हे केवळ राजकीय कार्यक्रम न राहता "माणुसकी जपणारा उपक्रम" म्हणूनही पाहिले जात आहे. दुःखाच्या क्षणी आधार देणारी ही सुविधा अनेक कुटुंबांसाठी खऱ्या अर्थाने दिलासा ठरणार आहे.

## १० वर्षीय मुलीवर बिबट्याचा हल्ला; मुलगी जखमी

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर परिसरातील वाकचौरे मळा येथे गुरुवारी दि. २१ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने पाचवीत शिकणाऱ्या काव्या महेंद्र वाकचौरे (रा. वाकचौरे मळा, ओतूर) हिच्यावर अचानक हल्ला केल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मुलीच्या पालकांनी वनविभागाला दिली असून वनाधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पुन्हा एकदा बिबट्याच्या हल्ल्याची धक्कादायक घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास काव्या घराजवळ वडिलांच्या मागे शेतात जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक तिच्यावर झडप घातली. मुलीच्या आरडाओरडीनंतर परिसरातील नागरिकांनी मोठमोठ्याने आवाज करत घटनास्थळी धाव घेतल्याने बिबट्याने जंगलाच्या दिशेने पळ काढला. या हल्ल्यात काव्याच्या पाठीवर गंभीर जखमा झाल्या असून तिला तातडीने ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची माहिती ओतूरचे वनपरीक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी दिली.

परिसरात बिबट्याची दहशत निर्माण झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, वाकचौरे मळा परिसरात वारंवार बिबट्यांचा वावर वाढत असल्याने वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संतप्त ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# भगवान दत्तात्रयांच्या नामघोषाने देवगडनगरी दुमदुमली

नेवासा : (स. गांवकरी)



त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासानिमित्त नेवासा तालुक्यातील भू लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या श्री गुरूदेव दत्त पीठ क्षेत्र देवगड येथे राजस्थान जोधपूर येथील गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद भागवत कथा सोहळयाला भागवत ग्रंथ शोभायात्रा मिरवणूकीने व गोमातेच्या पूजनाने प्रारंभ करण्यात आला.यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात व भगवान दत्तात्रयांच्या नामघोषाने झालेल्या शोभायात्रा मिरवणुक प्रसंगी देवगडनगरी दुमदुमली होती. पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आयोजित श्रीमद भागवत कथा व किर्तन सोहळयाला विठ्ठल भक्तीरस महोत्सव असे नाव देण्यात आले आहे.देवगड येथील प्रांगणातून टाळ मृदुंगाच्या गजरात गुरुवारी शोभायात्रा मिरवणुकीला प्रारंभ झाला मिरवणुकीत गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज,देवगड दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज,उत्तराधिकारी स्वामी

प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या समवेत वारकरी संप्रदायातील संत महंत कीर्तनकार प्रवचनकार पुरुष व महिला भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

निघालेल्या शोभायात्रेच्या प्रसंगी गो शाळेतील गोमतेचे तसेच गंगा पात्रात जाऊन गंगेचे पूजन गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज,गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या समाधी मंदिरात जाऊन मूर्तींचे पूजन करण्यात आले.

कथा सुरू असलेल्या ज्ञानसागर सभामंडपात शोभायात्रा मिरवणूकीचा समारोप करण्यात आला.यावेळी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते श्रीमद भागवत ग्रंथाचे पूजन तर श्री राधाकृष्णजी महाराज यांचे संतपूजन तुळशी हार घालून करण्यात आले.

यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की पुरुषोत्तम मासाच्या पवित्र पर्व काळात श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा व भगवान दत्तात्रयांच्या कृपा आशीर्वादाने गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद भागवत कथा श्रवणाची पर्वणी आपल्याला पुन्हा प्राप्त झाली आहे,राधा हे भक्तीचे तर कृष्ण हे ज्ञानाचे प्रतीक असल्याने हया दोन्हीही गोष्टी आपल्याला श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या कथा सोहळयाच्या माध्यमातून भक्तीचे पूर्णत्व प्राप्त होणार आहे.

गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज हे भागवत कथेच्या माध्यमातून भक्तांना सुख समाधानाचा मार्ग प्राप्त करून देण्याचे काम करत आहे,भागवत कथा ही पूर्व पुण्याईने श्रवण होते या कथेच्या माध्यमातून आपल्याला गोपालकृष्ण भगवंताचे चरित्र ऐकावयास मिळणार असल्याने भक्तांना देखील याचा आनंद मिळणार आहे, जगात कस जगावं हे गीता शिकवते तर कस मरावं हे आपल्याला भागवत शिकवते,जन्म मरणाचे साकडे कथा श्रवणाने सुटते सर्वांनी या पर्व काळातील कथा श्रवणाचा तसेच यामुळे मिळणारा बाहय व आंतरिक आनंद घेण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

कथेच्या शुभारंभ प्रसंगी शेणाने सारवलेले मॅट आकर्षक रांगोळया,पुरातन काळातील कंदील,तांबे पितळाचे हांडे, चटईची कुटीया या पद्धतीने सजवलेले कथा व्यासपीठ,कथेच्या मागे पंढरीच्या पांडुरंगाची संतांना खांद्यावर घेतलेली प्रतिमा सर्वांचेच आकर्षण ठरले होते

कथा सोहळयाच्या प्रारंभीच वारकरी संप्रदायातील संत महंत मंडळी यांच्यासह युवक बालबालिका, महिला पुरुष भाविकांनी मोठी गर्दी केली होती.